पाक्षिक
प्रदेश बीजेपी

# मनोगत

मुंबई । वर्ष: 6 । अंक: 22 । 16 नोव्हेंबर, 2024 । पृष्ठसंख्या: 36 । किंमत: 5 रू.



# महाविजयाकडे...









## अध्यक्षीय मनोगत

# विजयाच्या दिशेने वाटचाल

पंतप्रधान मा. नरेंद्र मोदी जी यांच्या नेतृत्वात भारतीय जनता पार्टी महायुतीचा राज्यभरात विधानसभा निवडणुकीचा प्रचार जोरदार चालू आहे. मा. मोदीजींच्या राज्यात दहा सभा झाल्या व सर्वत्र जनतेचा प्रचंड प्रतिसाद मिळाला. मा. केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांनी राज्याच्या सर्व विभागात सभांना संबोधित केले. त्यांच्या सभांमध्येही जनतेचा आणि कार्यकर्त्यांचा उत्साही प्रतिसाद होता. भाजपा राष्ट्रीय अध्यक्ष मा. जगत प्रकाश नड्डा जी यांच्या राज्यातील प्रवासात ठिकठिकाणी जाणत्या मतदारांशी उत्तम संवाद झाला. केंद्रीय मंत्री मा. नितीनजी गडकरी आणि मा. उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या सभांचा झंझावात सुरू आहे. ठिकठिकाणी उत्तर प्रदेशचे मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ सभा गाजवत आहेत. आपल्या प्रमुख नेत्यांसोबत बूथ कार्यकर्त्यांपर्यंत सर्वजण उत्साहाने निवडणुकीच्या कामाला लागले आहेत. त्यासोबत भाजपाला पाठिंबा देणारे समाजातील अनेक मान्यवर निवडणुकीत मेहनत करत आहेत. प्रदेशाध्यक्ष म्हणून मी या सर्वांचे आभार मानतो. एकूण निवडणुकीचे वारे पाहिले तर भाजपा महायुती विजयाच्या दिशेने चालली आहे, असे स्पष्ट होते. केंद्रीय गृहमंत्री मा. अमित शाह यांच्या हस्ते भाजपा महायुतीच्या निवडणूक संकल्प पत्राचे प्रकाशन मुंबईत झाले. मनोगतच्या या अंकात आपल्या संकल्प पत्रातील आश्वासनांची माहिती दिली आहे. कार्यकर्त्यांनी संकल्प पत्रातील मुद्दे मतदारांपर्यंत पोहोचवायचे आहेत. संकल्प पत्रातील मुद्दे ही केवळ आश्वासने नाहीत तर त्यामागे अंमलबजावणीचा दृढ संकल्प आहे. मा. मोदीजींच्या नेतृत्वात देशात भाजपाने जी कार्यपद्धती अंमलात आणली आहे त्यामध्ये आश्वासनांची पूर्तता ही सर्वात महत्त्वाची बाब आहे. आपल्या संकल्प पत्रात शेतकरी, महिला, युवा आणि गरीब यांच्या कल्याणासाठी अनेक महत्त्वाची आश्वासने आहेत. त्यासोबत महाराष्ट्रातील पायाभूत सुविधांची कामे करून राज्याच्या आर्थिक विकासाची हमी देणारे मुद्देही आहेत. मुख्यमंत्री लाडकी बहीण अशा अनेक योजनांची आपल्या सरकारने घोषणा केली व त्यांची यशस्वी अंमलबजावणी केली. समृद्धी महामार्ग आणि अटल सेतू अशी फार मोठी कामे आपल्या सरकारने केली. आधी केले मग सांगितले, हे भाजपा महायुती सरकारचे वैशिष्ट्य आहे. दुसरीकडे विरोधकांकडे मात्र विकासाचे काही मुद्दे नाहीत. त्यांनी केवळ आपल्या योजनांची नक्कल केली आहे. कालपर्यंत लाडकी बहीणसारख्या योजनांवर टीका करणारे आपले विरोधक आता तशीच आश्वासने देऊ लागले आहेत. विरोधी पक्षाच्या आश्वासनातला पोकळपण उघड करण्याचीही कार्यकर्त्यांची जबाबदारी आहे. एकूण या ऐतिहासिक विधानसभा निवडणुकीत भाजपा महायुतीसाठी अनुकूल वातावरण निर्माण झाले आहे आणि आपण विजयाच्या दिशेने चाललो आहोत. आता शेवटच्या टप्प्यात जोर लावायचा आणि संपूर्ण विजय मिळवूनच थांबायचे आहे. मुख्य म्हणजे दि. २० रोजी आपले प्रत्येक मत मशिनमध्ये नोंदविले जाईल याची खबरदारी घ्यायची आहे. विधानसभा निवडणुकीत रात्रंदिवस काम करणाऱ्या सर्व कार्यकर्त्यांना मतदानाच्या अंतिम आणि सर्वात महत्त्वाच्या टप्प्यासाठी शुभेच्छा.

**चंद्रशेखर बावनकुळे**

# अंतरंग

०४ फक्त बोलत नाही तर करून दाखवतो




१० शेतक-यांना पूर्ण कर्ज माफी, लाडक्या बहिणींना 2100 रू.



१६ खोट्या प्रचाराची हवा संपली महायुतीच बहुमत मिळवणार



२१ आण्विक पाणबुडी SSBM S4*



२३ भारतीय विकासाची कथा




२५ नागपूरसह विदर्भाच्या विकासाला चालना






संपादक : गणेश हाके

सल्लागार : माधव भांडारी

आ. अतुल भातखळकर

@manogatbjp

सर्व भाजपा हितचिंतक, कार्यकर्ते आणि वाचकांना विनंती आहे की आपण आपल्या प्रतिक्रिया,
bjpmaha.manogat@gmail.com
editor.bjpmanogat@gmail.com
येथे पाठवाव्यात.

संपादकीय सल्लागार

चंद्रहास मिरासदार

सजावट व मांडणी : गौतम आर्य

सहाय्यक : प्रेरणा तळेकर–वीर

विभागीय समन्वयक

मराठवाडा (छत्रपती संभाजीनगर) : श्रीनिवास कुलकर्णी

विदर्भ: दीपक माई, त्रिकाल अडसड, प्रवीण गमे

पश्चिम महाराष्ट्र: संजय मयेकर

उत्तर महाराष्ट्र: गोविंद बोरसे

हे पाक्षिक भारतीय जनता पार्टीसाठी प्रकाशक, मुद्रक, मुकुंद कुलकर्णी यांनी विवेक मुद्रणालय, ५, कामत इंडस्ट्रीयल इस्टेट, ३९६, वीर सावरकर मार्ग, प्रभादेवी, मुंबई – ४००० २० येथे छापून भारतीय जनता पार्टी, प्रदेश कार्यालय, जीवन बीमा मार्ग, वसंतराव भागवत चौक, सी.डी.ओ. बॅरेक नं.१, मुंबई –२० येथे प्रकाशित केले. संपर्क : ०२२–२२०२२०५०

# फक्त बोलत नाही तर करून दाखवतो

नोव्हेंबर २०१९ ते जून २०२२ या कालावधीतील महाविकास आघाडी सरकारचे कामकाज आणि जून २०२२ ते ऑक्टोबर २०२४ या महायुती सरकारच्या कामकाजाची तुलना महायुती सरकारने आपल्या रिपोर्टकार्डमध्ये केली आहे, उद्योग परराज्यात गेल्याचा विरोधकांचा आरोप पोकळ असल्याचे आकडेवारीतूनच मांडले आहे.




**महाविकास** आघाडी सरकारच्या काळात देशातील एकूण एफडीआयच्या तुलनेत महाराष्ट्रात २६.८३ टक्के गुंतवणूक आली. महायुतीच्या काळात हीच गुंतवणूक ३६.९० टक्के राहिली. महाविकात आघाडीच्या काळात स्थिर किंमतींवर आधारित वास्तविक जीएसडीपीचा दर हा १.९ टक्के होता. त्यात महायुतीच्या काळात ६.६ टक्क्यांची वाढ झाली. या काळात हा दर ८.५ टक्क्यांवर पोहोचला. मविआच्या तुलनेत शेतकऱ्यांना अधिक मदत महाविकास आघाडी सरकारच्या काळात शेतकऱ्यांना नैसर्गिक आपत्तीसाठी नुकसानभरपाई म्हणून केवळ ८ हजार ७०१ कोटी निधी वितरित करण्यात आले. महायुती सरकारने आपल्या कार्यकाळात १६ हजार ३०९ कोटी निधी वितरित केला. मदत निधीतील वाढ ८० टक्के इतकी आहे. दुसरीकडे, महाविकास आघाडी सरकारने अवघे ३९६ रोजगार मेळावे घेत घेत ३६ हजार युवांना रोजगार दिले. तर, महायुतीने आपल्या काळात १ हजार १३८ मेळावे घेतले. त्यातून १ लाख ५१ हजार ४०८ युवांना रोजगार मिळाला, महायुती सरकारच्या काळातील रोजगार मेळाव्यांची संख्या तिपटीने वाढली. तर, रोजगार निर्मितीत ३१५ टक्के वाढ नोंदविली गेली. महाविकास आघाडी सरकारने स्वयं सहायता गटांना मदत म्हणून १३ हजार ९४१ कोटी दिले. तर, महायुतीने आपल्या काळात २८ हजार ८११ कोटींचा निधी दिला. महाविकास आघाडी सरकारच्या काळात महाराष्ट्रात गरिबांसाठी ६.५७ लाख घरे बांधण्यात आली. महायुतीच्या काळात मात्र ही संख्या १०.५२ लाख इतकी आहे. एकूण ७५ टक्के अधिक घरे गरिबांसाठी निर्माण झाली. शबरी आदिवासी घरकुल योजनेत मविआने १८ हजार ११९ घरांसाठी ४४७ कोटी ६२ लाखांचा निधी दिला. तर महायुती सरकारने आपल्या कार्यकाळात तब्बल १ लाख २५ हजार ६९९ घरांसाठी ७७१ कोटी ८४ लाखांचा निधी मंजूर केला. घराच्या संख्येत सात पट आणि निधी ७२ टक्के इतकी वाढ महायुतीने केली. महाविकास आघाडी सरकारने भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्वाधार योजनेत ४० हजार १८९ विद्यार्थ्यांना २२२ कोटींचा लाभ दिला. तर, महायुती सरकारने ९२ हजार ३८८ विद्यार्थ्यांना ४९२ कोटी कोटींचा लाभ दिला.

● गेल्या ५ वर्षात महाराष्ट्राने दोन सरकारे अनुभवली. उद्धव ठाकरे, शरद पवार आणि काँग्रेसचे महाविनाश आघाडीचे सरकार अडीच वर्षात महाराष्ट्रातील जनतेला सरकार कसे असू नये, याचा अनुभव देऊन गेले. त्यानंतर एकनाथ शिंदे, देवेंद्र फडणवीस आणि अजित पवार यांच्या महायुती सरकारने आश्वासने पूर्ण करणारे सरकार कसे असते, याचा अनुभव सामान्य माणसाला दिला. लाडकी बहीण योजना जाहीर केल्यावर ही योजना सुरूच होणार नाही, अशी टीका महाविनाश आघाडीच्या नेत्यांनी केली होती. मात्र ही योजना सुरू होऊन लाभार्थी महिलांच्या खात्यात ३ हप्ते जमाही झाले.

*याला म्हणतात शब्दाला जागणारे सरकार.*

● शेतकऱ्यांना मोफत वीज देण्याची घोषणा उपमुख्यमंत्री व ऊर्जा मंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केली होती. मोफत वीज योजनेस पात्र असणाऱ्या शेतकऱ्यांना एप्रिल २०२४ पासून वीज बिल येत नाही.

*याला म्हणतात काम करणारे सरकार.*

● बाजारातील चढ-उतारामुळे सोयाबीन व कापूस उत्पादकांना भरपाई देण्याची घोषणा महायुती सरकारने केली होती. या घोषणेनंतर लोकसभा निवडणुकीची आचारसंहिता लागू झाली. त्यामुळे सोयाबीन आणि कापूस उत्पादकांना भरपाईची रक्कम दिली गेली नाही. त्यानंतर लगेचच ४९ लाख शेतकऱ्यांच्या खात्यात २ हजार ३९८ कोटी रुपये जमा करण्यात आली.

*याला म्हणतात शेतकऱ्यांच्या पाठीमागे खंबीरपणे उभे राहणारे सरकार.*

● गायीच्या दुधाला प्रति लिटर ५ रुपये एवढे अनुदान देण्याची योजना महायुती सरकारने सुरू केली. त्यानुसार १ लाख ५१ हजार शेतकऱ्यांच्या खात्यात ३७ कोटी २० लाख रुपयांचे अनुदान जमा झाले आहे.

*याला म्हणतात कार्यक्षम सरकार.*

## प्रगतिपुस्तकातील प्रमुख मुद्दे



### महिला सशक्तीकरण

● मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजना २.५ कोटी महिलांना दरमहा १५०० रुपये.


● राज्यातील गरजू मुलींना मोफत उच्च शिक्षण

● लेक लाडकी योजना- गरीब कुटुंबातील नवजात मुलींसाठी पालकांच्या खात्यात १ लाख रुपये हप्त्यांत जमा होत आहेत.

● शेतकरी- नमो शेतकरी महासन्मान निधी योजना ९२.४३ लाख शेतकऱ्यांना दरवर्षी १२,००० रुपये.

● १ रुपयात पीक विमा योजना- २.४२ कोटी शेतकऱ्यांना आणि १.६२ की हेक्टर जमीनीला संरक्षण

● मुख्यमंत्री बळीराजा मोफत वीज योजना- ४४ लाख शेतकऱ्यांना रुपये १४,७६१ कोटींच्या अनुदानासह मोफत वीज



### युवा

● मुख्यमंत्री माझा लाडका भाऊ योजना १० लाख विद्यार्थ्यांना ऑन-द-जॉब प्रशिक्षणासाठी दरमहा ६ ते १० हजारांचे विद्यावेतन

● राजर्षी छत्रपती शाहू महाराज शिक्षण शुल्क शिष्यवृत्ती योजनेंतर्गत आर्थिकदृष्ट्या मागासलेल्या ४.६२ लाख विद्यार्थ्यांना १ हजार २१८ कोटी रुपयांची शिष्यवृत्ती



### ज्येष्ठ नागरिक

● पेन्शन योजना: ४५.६ लाख लाभार्थ्यांसाठी महिन्याच्या निवृत्तीवेतनाची रक्कम एक हजार वरून दीड हजार करण्यात आली.

### रोजगार

● अण्णासाहेब पाटील आर्थिक विकास महामंडळाच्या माध्यमातून १.०२ लाख उद्योजकांना एकूण ८४४.२८

कोटी रुपयांचे कर्ज वाटप पोलिस कॉन्स्टेबलच्या १८ हजार ३३१ रिक्त पदांसाठी भरती पूर्ण, आणखी १७ हजार ४०१ पदे भरण्याची प्रक्रिया सुरू आहे.



### आरोग्य

● हिंदुहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे आपला दवाखाना योजना ७०० आरोग्य केंद्रांवर मोफत आरोग्य तपासणी, औषधे, रक्त आणि प्रयोगशाळा चाचण्यांची सुविधा ग्रामीण विकास.

● समृद्धी महामार्ग हा ६०,७८८ कोटींचा १० जिल्हे आणि ३२० गावे ओलांडणारा ४०१ किलोमीटरचा मार्ग पूर्णत्वाकडे.



### उद्योगधंदे

● थेट परकीय गुंतवणुकीत मागील दोन वर्षांत २.७३ लाख कोटींची गुंतवणूक मिळाली. भारतातील एकूण एफडीआय पैकी ४० टक्के महाराष्ट्रात, आपला महाराष्ट्र पुन्हा प्रथम क्रमांकावर



### शहरी पायाभूत सुविधा

● अटल सेतू हा भारताचा २१.८ कि.मी. लांबीचा सर्वात मोठा सागरी पूल १८ हजार ५९९ कोटींच्या खर्चात पूर्ण होऊन लोकार्पण झाले.

● पुनर्विकास प्रकल्पांतर्गत १० लाख रहिवाशांसाठी २३,००० कोटी खर्चाचा धारावी पुनर्विकास प्रकल्प.

### ओबीसी समाजालाही न्याय

**केंद्र**

● ओबीसी आयोगाला संवैधानिक दर्जा.

● वैद्यकीय प्रवेश : राष्ट्रीय कोट्यात ओबीसींना २७ टक्के आरक्षण.

● विश्वकर्मा योजना : १३,००० कोटी.

● सर्वाधिक ओबीसी मंत्री केंद्रीय मंत्रिमंडळात, सर्वाधिक खासदार, विधानसभा आणि विधानपरिषद सदस्य.

**राज्य**

● देवेंद्र फडणवीस मुख्यमंत्री असताना ओबीसींसाठी २६ जीआर काढलं गेलं.

● स्वतंत्र ओबीसी मंत्रालय स्थापन.

● शिक्षण, रोजगार, छात्रावास, आयएएस/आयपीएस प्रशिक्षण, विदेश शिष्यवृत्ती याचे निर्णय.

● ओबीसी राजकीय आरक्षण.

● ओबीसींसाठी १० लाख घरांची मोदी आवास योजना.

● ओबीसींसाठी ४००० कोटींची तरतूद (२०२३-२४)

● लिंगायत : जगदज्योती महात्मा बसवेश्वर आर्थिक विकास महामंडळ.

● गुरव : संत काशिबा गुरव युवा आर्थिक विकास महामंडळ.

● व्हीजेएनटी : पैलवान मारुती चव्हाण वडार आर्थिक विकास महामंडळ.

● व्हीजेएनटी : राजे उमाजी नाईक आर्थिक विकास महामंडळ (रामोशी).

● महाज्योतीच्या माध्यमातून विविध योजना.

● ओबीसी विद्यार्थ्यांसाठी मॅट्रीकपूर्व व मॅट्रिकोत्तर शिष्यवृत्तीसाठी १२०० कोटी.

● ओबीसींसाठी ७५ वसतीगृह पूर्ण.

### अनुसूचित जाती

● इंदूमिल स्मारकाची चर्चा आघाडी सरकारच्या काळात अनेक वर्ष होत होती. देवेंद्र फडणवीस यांनी पुढाकार घेतला. ३ दिवसांत मोदीजींकडून ३६०० कोटींची जमीन, फडणवीस मुख्यमंत्री असताना भूमिपूजन, स्मारकाचे काम प्रगतीपथावर.

● डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या लंडनमधील घराचे स्मारकात रुपांतर, देवेंद्र फडणवीस मुख्यमंत्री असताना निधी देऊन महाराष्ट्र सरकारने ते घर खरेदी करीत त्याचे स्मारकात रुपांतर केले. मोदीजींच्या हस्ते लोकार्पण.

● कोयासन विद्यापीठात डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा पुतळा.

● दीक्षाभूमी आणि चैत्यभूमीला अ वर्ग तीर्थक्षेत्र आणि पर्यटनस्थळ दर्जा.

# मराठा समाजासाठी महायुती सरकारने घेतलेले निर्णय

## विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती, १ लाख मराठा उद्योजक तयार करण्यास सहाय्य

● अण्णासाहेब पाटील आर्थिक विकास महामंडळाचे पुनरुज्जीवन.

● १ लाखांहून अधिक बनले उद्योजक, ८ हजार ३२० कोटींचे कर्ज वितरित.

● मराठा आंदोलनात मृत्यू झालेल्या ४२ आंदोलनकर्त्यांपैकी पात्र ३५ वारसांना एसटीत नोकरी. या ३५ कुटुंबांना मुख्यमंत्री सहाय्यता निधीतून प्रत्येकी १० लाख प्रदान.

● राजर्षि छत्रपती शाहू महाराज शैक्षणिक शुल्क प्रतिपूर्ती योजना.




● सर्व आर्थिक मागास १७ लाख ५४ हजार ४९४ विद्यार्थ्यांना व्यावसायिक शिक्षणासाठी ९ हजार २६२ कोटी रुपये मंजूर.

● सारथी : राष्ट्रीय अधिछात्रवृत्ती योजनेतून युपीएससीत : ५१ उमेदवार यशस्वी (१२ आयएएस, १८ आयपीएस, ८ आयआरएस, १ आयएफएस, १२ इतर सेवा).

● एमपीएससीत : ४८० उमेदवार यशस्वी, एकूण २ हजार १०९ विद्यार्थ्यांना ९७ कोटी रुपये.

● सारथीमार्फत ८० हजार विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती.

● सारथी विभागीय कार्यालये (छत्रपती शिवाजी महाराज संकुल).

● एकूण ८ विभागात शासनाकडून विनामूल्य जमिनी.

● सारथी पुणे कार्यालय : ४२.७० कोटी.

● सारथी खारघर : ११९.३८ कोटी रुपये.

● सारथी उपकेंद्र, कोल्हापूर : १७६.३८ कोटी रुपये.

● सारथी नाशिक : १५८.९९ कोटी रुपये.

● छत्रपती संभाजीनगर : १४०.२४ कोटी रुपये.

● लातूर : १७२.८६ कोटी रुपये.

● नागपूर : २०४.६४ कोटी रुपये.

● असे एकूण : १०२४ कोटी रुपये

(या प्रत्येक ठिकाणी ३०० विद्यार्थ्यांची अभ्यासिका /५०० मुले आणि ५०० मुलींचे वसतीगृह असणार).

● कौशल्य प्रशिक्षण : सारथीतर्फे ३५ हजार ७२६ विद्यार्थ्यांना कौशल्य प्रशिक्षण.

● कौशल्य विकास प्रशिक्षण कार्यक्रम : छत्रपती संभाजी महाराज सारथी युवा व्यक्तिमत्त्व विकास : २७ हजार ३४६ विद्यार्थ्यांचे प्रशिक्षण सुरु.

● श्रीमंत मालोजीराजे भोसले सारथी व इंडो-जर्मन टूलरुम प्रशिक्षण.१४६ प्रशिक्षण पूर्ण/४६६ प्रशिक्षण सुरु.

● ९ ते ११ साठी छत्रपती राजाराम महाराज सारथी शिष्यवृत्ती योजना : गेल्यावर्षी ३२ हजार ५३९ विद्यार्थ्यांना ३१.२३ कोटी रुपये, यावर्षी ४४ हजार १०२ विद्यार्थ्यांना ४२ कोटी रुपये.

● महाराजा सयाजीराव गायकवाड परदेशी शिक्षण शिष्यवृत्ती योजना : ४ जुलै २०२३ रोजी मंत्रिमंडळाची मान्यता/दरवर्षी ७५ विद्यार्थी/एमएससाठी ६० लाख तर पीएचडीसाठी १.६० कोटी.

● छत्रपती शिवाजी महाराज स्मृती ग्रंथाच्या ५० हजार प्रती प्रकाशित.

● डॉ. पंजाबराव देशमुख वसतीगृह योजना : ३ लाख ७९ हजार ३७३ विद्यार्थ्यांना १२९३ कोटी रुपये वितरित.




**डॉ. पंजाबराव देशमुख वसतिगृह योजने अंतर्गत**

- **२,९३, १९९ ग्रामीण विद्यार्थ्यांना निर्वाह भत्ता रु. ७८० कोटी ४४ लाख ५७ हजार वितरीत.**
- वैद्यकीय शिक्षण घेणाऱ्या २३,६९५ विद्यार्थ्यांना निर्वाह भत्ता रु. ३८ कोटी ७० लाख वितरीत.

**उच्च व तंत्र शिक्षण विभाग शासन निर्णय**
टीइएम - २०१६ /प्र.क्र. ५०१/ताशि-४, दि. १३ ऑक्टोबर २०१६.



**डॉ. पंजाबराव देशमुख वसतिगृह योजना ग्रामीण विद्यार्थ्यांच्या निर्वाह भत्यात वाढ - गरजू विद्यार्थ्यांना मोठा दिलासा**

| अ. क्र. | भत्ता | मुंबई शहर, मुंबई उपनगर, नवी मुंबई, ठाणे, पुणे, पिंपरी चिंचवड, नागपूर या शहरात उच्च शिक्षण घेणारे विद्यार्थी | इतर महसुली विभागीय शहरातील व उर्वरित क वर्ग महापालिका क्षेत्रामध्ये उच्च शिक्षण घेणारे विद्यार्थी (संभाजीनगर, नाशिक, अमरावती | इतर जिल्ह्यांच्या ठिकाणी उच्च शिक्षण घेणारे विद्यार्थी | तालुका ठिकाणी उच्च शिक्षण घेणारे विद्यार्थी |
|---|---|---|---|---|---|
| १ | भोजन भत्ता | ३२,०००/- | २८,०००/- | २५,०००/- | २३,०००/- |
| २ | निवास भत्ता | २०,०००/- | १५,०००/- | १२,०००/- | १०,०००/- |
| ३ | निर्वाह भत्ता | ८,०००/- | ८,०००/- | ६,०००/- | ५,०००/- |
| | **एकूण** | **६०,०००/-** | **५१,०००/-** | **४३,०००/-** | **३८,०००/-** |

**उच्च व तंत्र शिक्षण विभाग शासन निर्णय** क्र. पनियो - २०२२/प्र.क्र. १८६/ताशि-४, दि. ५ जानेवारी २०२४.

https://mahadbt.maharashtra.gov.in

● स्वाधार योजना : निर्वाह भत्त्यात वाढ. प्रतिवर्ष प्रतिविद्यार्थी.

● महानगरात : ६० हजार रुपये.

● विभागीय मुख्यालय ठिकाणी : ५१ हजार रुपये.

● जिल्हा ठिकाणी : ४३ हजार रुपये.

● तालुका ठिकाणी : ३८ हजार रुपये.

● थेट विद्यार्थ्यांच्या खात्यात.

# फडणवीस सरकारने मराठा आरक्षण कायद्याद्वारे दिले



**अभिमत विद्यापीठात फी सवलत लागू**


- राज्यातील अभिमत विद्यापीठामध्ये (DEEMED University) व्यावसायिक अभ्यासक्रमासाठी विद्यार्थ्यांकरिता नव्याने राजर्षी शाहू महाराज शिक्षण शिष्यवृत्ती योजना लागू करुन या विद्यापीठात शिकणाऱ्या विद्यार्थी - विद्यार्थिनींना मोठा दिलासा.



**मेडिकलच्या विद्यार्थीनींना मिळणार वर्षाला १२ लाख, विद्यार्थ्यांना ६ लाख**

- राज्यात आतापर्यंत राजर्षी छत्रपती शाहू महाराज शिष्यवृत्ती योजने अंतर्गत मुलामुलींना ५०% फी सवलत मिळत होती. आता नव्या शासन निर्णयानुसार मुलींसाठी १००% फी सवलत दिल्यामुळे वैद्यकीय महाविद्यालयातील मेडिकलच्या विद्यार्थीनींना मिळणार वर्षाला १२ लाख.
- आत्तापर्यंत वैद्यकीय शिक्षणासाठी **७८,३११ विद्यार्थ्यांना ५०% फी सवलत रु. ६३९ कोटी ३२ लाख वितरीत.**

१९८२ पासून मराठा आरक्षणासाठी आंदोलन चालू होते. २०१४ पर्यंत बहुसंख्य वर्षे काँग्रेस आणि राष्ट्रवादीची सत्ता होती. मात्र एकाही काँग्रेस मुख्यमंत्र्याने मराठा समाजाला आरक्षण देणारा कायदा केला नाही. देवेंद्र फडणवीस यांनी मुख्यमंत्री असताना २०१८ मध्ये मराठा समाजाला कायद्याद्वारे आरक्षण दिले. हे आरक्षण उच्च न्यायालयात टिकले. सर्वोच्च न्यायालयातही पहिल्या सुनावणीपर्यंत हे आरक्षण लागू होते. उद्धव ठाकरे यांच्या महाविकास आघाडी सरकारने सर्वोच्च न्यायालयातील सुनावणीवेळी हे आरक्षण टिकण्यासाठी प्रयत्न न केल्याने ते रद्द झाले. तोपर्यंत म्हणजे २०२०-२१ पर्यंत फडणवीस सरकारने दिलेल्या आरक्षणानुसार हजारो मराठा विद्यार्थ्यांना शैक्षणिक प्रवेश मिळाले. २ हजार ४०० मराठा युवक-युवती डॉक्टर बनले. एकूण अधिसंख्य सुमारे ४ हजार ५०० पदे भरली.



### जिजाऊ-सावित्रींच्या महाराष्ट्रात विद्यार्थिनींसाठी १००% फी सवलत (सन २०२४-२५ या वर्षापासून)

- ८ लाख रुपये उत्पन्नाच्या आतील विद्यार्थिनींना व्यावसायिक अभ्यासक्रमांसाठी सन २०२४-२५ या वर्षापासून १००% शैक्षणिक फी माफ करण्याचा ऐतिहासिक निर्णय.
- या साठी ९०६ कोटी रुपयांची तरतूद.
- या निर्णयाचा मराठा, मराठा-कुणबी तसेच खुला आणि इतर मागासप्रवर्गातील विद्यार्थिनींना मोठ्या प्रमाणावर लाभ होणार.

महायुती सरकारने मराठा समाजाला पुन्हा १० टक्के स्वतंत्र आरक्षण दिले. २०२४ मध्ये झालेल्या पोलीस भरतीमध्ये मराठा समाजातील ८९२ युवकांना आर्थिक व शैक्षणिक मागासवर्ग प्रवर्गाअंतर्गत भरती मिळाली.

*२०१८ मध्ये आरक्षण लागू झाल्यानंतर शासनाच्या सेवेत ३ हजार ७०० मराठा उमेदवारांची निवड झाली होती. मात्र त्यांना नियुक्ती मिळाली नव्हती. २०२०-२१ मध्ये आरक्षणाला स्थगिती मिळाल्यानंतर व आरक्षण रद्द झाल्यानंतर या ३ हजार ७०० उमेदवारांना शासकीय सेवेत सामावून घेण्यासाठी महायुती सरकारने अधिसंख्यपदाचा कायदा केला आणि या ३ हजार ७०० उमेदवारांना नियुक्त्या दिल्या.*



### सारथी

- मराठा व मराठा-कुणबी समाजाच्या युवक, युवतींना ज्ञान विज्ञान तंत्रज्ञान क्षेत्रात उद्याच्या उज्वल भविष्यासाठी यशस्वी ठरत असलेली.
- **छत्रपती शाहू महाराज संशोधन, प्रशिक्षण व मानव विकास संस्था (सारथी).**
- सारथी मुख्यालय, बीएमसीसी रोड, पुणे- अद्ययावत इमारत पूर्ण.
- सारथी करिता आत्तापर्यंत ७६१ कोटी निधी वितरित १ लाख ६० हजार विद्यार्थी, महिला युवक-युवतींना लाभ.

**‘सारथी’मार्फत मराठा समाजातील सुमारे ५१ हजार विद्यार्थ्यांना रोजगार व स्वयंरोजगारासाठी प्रशिक्षण.**



### मराठा उद्योजकतेला चालना


- **अण्णासाहेब पाटील आर्थिक मागास विकास महामंडळ नवीन वैयक्तिक कर्ज व्याज परतावा योजनेने घडवले १ लाख उद्योजक.**
- बँक कर्ज मंजुरी **लाभार्थी संख्या १,०३,७३९** बँकेने वितरीत केलेली **कर्ज रक्कम रु. ८,६९३.८५ कोटी, महामंडळाने व्याज परतावा दिलेली रक्कम रु. ८७२.८१ कोटी.**
- महामंडळाच्या माध्यमातून १ लाखाहून अधिक मराठा समाजातील नवउद्योजकांना मोठ्या प्रमाणात लाभ व रोजगार निर्मितीला चालना.
- रु. १५ लाखापर्यंत बँकांमार्फत कर्ज घेणाऱ्या उद्योजकांना १२% व्याज परतावा महामंडळामार्फत.



## UPSC

### सारथीच्या विद्यार्थ्यांचा UPSC त झेंडा.

- आतापर्यंत सारथी संस्थेकडून प्रशिक्षणासाठी प्रायोजकत्व घेतलेल्या **९५ विद्यार्थ्यांची** वर्ष २०२२-२३ आणि २०२३-२४ वर्षात केंद्रीय लोकसेवा आयोग **(UPSC) परीक्षेत निवड.**
- **यामध्ये १८ IAS, २० IPS, १३ IRS, ०१ IFS, IFoS, CAPF अशा पदांचा समावेश.**



## MPSC

## अभिमानास्पद

### सारथी पुरस्कृत विद्यार्थ्यांचा MPSC त झेंडा.

- **अवघ्या २ वर्षात MPSC परिक्षेत सारथी पुरस्कृत ४८१ मराठा, मराठा-कुणबी, कुणबी विद्यार्थी उत्तीर्ण. हे यश अभुतपूर्व आहे.**
- MPSC परीक्षेअंतर्गत राज्यसेवा, न्यायिक सेवा, कृषी सेवा, वनसेवा, स्थापत्य अभियांत्रिकी सेवा इत्यादी परीक्षेत सारथी संस्थेचे पुरस्कृत विद्यार्थी उत्तीर्ण वर्ग-१ दर्जाच्या पदांवर एकूण १५८ विद्यार्थ्यांची तर वर्ग-२ दर्जाच्या पदांवर ५८० पुरस्कृत विद्यार्थ्यांची निवड.
- विद्यार्थ्यांचे अभिनंदन आणि सारथीस धन्यवाद!





### परदेशात उच्च शिक्षणासाठी महाराजा सयाजीराव गायकवाड सारथी शिष्यवृत्ती योजना

- मराठा, कुणबी, मराठा कुणबी व कुणबी मराठा समाजाच्या ५१ विद्यार्थ्यांना परदेशामध्ये उच्च शिक्षणाची संधी.
- देशांतर्गत नामवंत विद्यापीठात ४४२ विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती

# शेतक-यांना पूर्ण कर्ज माफी, लाडक्या बहिणींना 2100 रू.




## संकल्पपत्र २०२४
## २५ ठळक मुद्दे

१. लाडक्या बहिणींना प्रत्येक महिन्याला रू. १५०० वरून रु. २१०० देण्यात येतील तसेच या योजनेचे औचित्य साधून महिलांमध्ये आर्थिक साक्षरता निर्माण करण्यासाठी प्रशिक्षण दिले जाईल. महिला सुरक्षेसाठी २५ हजार महिलांचा पोलिस दलात समावेश करण्यात येईल.

२. शेतकऱ्यांना कर्जमाफी आणि शेतकरी सन्मान योजनेतून वर्षाला १२ हजार वरून १५ हजार रुपये तसेच एमएसपीशी समन्वय साधत २० टक्क्यांपर्यंत भावांतर योजना राबविण्यात येईल.

३. प्रत्येक गरिबाला अन्न आणि निवारा देण्यात येईल.

४. वृद्ध पेंशन धारकांना महिन्याला रु. १५०० वरुन रू. २१०० देण्यात येतील जेणेकरुन संपूर्ण महाराष्ट्रात ज्येष्ठ नागरिकांना अधिक आर्थिक सुरक्षा सन्मान मिळेल.

५. महाराष्ट्रातील सर्व कुटुंबांना बाजारातील उतार– चढावांपासून सुरक्षित करण्यासाठी राज्यात जीवनावश्यक वस्तूंच्या किमती स्थिर ठेवण्यात येतील.

६. येणाऱ्या काळात २५ लाख रोजगार निर्मिती तसेच महिन्याला १० लाख विद्यार्थ्यांना रु. १० हजार विद्यावेतन देण्यात येईल.

७. राज्यातील ग्रामीण भागात ४५ हजार गावांत पांधर रस्ते बांधण्यात येतील.

८. अंगणवाडी आणि आशा सेविकांची आर्थिक सुरक्षा आणि कल्याण सुनिश्चित करण्यासाठी महिन्याला रु. १५ हजार वेतन आणि विमा संरक्षण देण्यात येईल.

९. वीज बिलात ३०% कपात करुन सौर आणि अक्षय उर्जेवर भर देण्यात येईल.

१०. सरकार स्थापनेनंतर १०० दिवसांच्या आत 'व्हिजन महाराष्ट्र २०२९' सादर करण्यात येईल.

११. सन २०२८ पर्यंत महाराष्ट्राला १ ट्रिलियन अर्थव्यवस्था बनविण्याचं लक्ष्य ठेवले आहे.

१२. महाराष्ट्राला तंत्रज्ञान, उत्पादन आणि नावीन्यपूर्ण (Innovation) संकल्पना क्षेत्रातील जागतिक केंद्र बनवण्यासाठी खालील पावलं उजलण्यात येतील:

- 'मेक इन महाराष्ट्र' धोरण राबवून, महाराष्ट्राचे भारतातील प्रमुख उत्पादक राज्य म्हणून असलेले स्थान अधिक मजबूत करण्यात येईल.
- महाराष्ट्राला जागतिक फिनटेक व कृत्रिम बुद्धिमत्ता (AI) राजधानी बनविण्यात येईल. त्यासाठी जागतिक फिनटेक कंपन्यांना आकर्षित करणार वातावरण निर्माण करण्यात येईल आणि आर्थिक तंत्रज्ञानातील नवीन संकल्पनांना प्रोत्याहन देण्यात येईल. सोबतच AI संशोधन नवकल्पना आणि विकासाला चालना देण्यासाठी देशातील पहिल्या विशेष AI विद्यापीठाची स्थापना करण्यात येईल.

● नागपूर, पुणे, छत्रपती संभाजीनगर, अहिल्यानगर आणि नाशिकला आधुनिक एरोनॉटिकल आणि स्पेस उत्पादन केंद्र बनवून प्रगत एरोस्पेस तंत्रज्ञान आणि उत्पादन हब म्हणून विकसित करण्यात येईल.

**१३.** शेतकऱ्यांचे उत्पन्न वाढवण्यासाठी सर्वांगीण उपक्रमांद्वारे पुढीलप्रमाणे प्रयत्न करू :

● शेतकऱ्यांनी खरेदी केलेल्या खतांवरील संपूर्ण राज्य वस्तू व सेवा (SGST) अनुदानाच्या स्वरुपात शेतकऱ्यांना परत देऊ.

● शेतकऱ्यांना प्रति क्विंटल किमान रु. ६ हजार/- भाव मिळावा यासाठी सोयाबीन उत्पादन, प्रकिया आणि मूल्यवर्धनासाठी समर्पित संपूर्ण श्रृंखलेची स्थापना करू.

**१४.** सन २०२७ पर्यंत महाराष्ट्रात ५० लाख लखपती दीदी तयार करण्यात येतील. यासाठी, प्रत्येक ५०० स्वयंसहायता गटांचे एक औद्योगिक क्लस्टर तयार करण्यात येईल आणि रु.१ हजार कोटींचा प्रारंभिक फिरता निधी उपलब्ध करण्यात येईल.

**१५.** 'अक्षय अन्न योजना' अंतर्गत, कमी उत्पन्न गटातील कुटुंबांना दरमहा मोफत शिधा पुरविण्यात येतील. ज्यामध्ये तांदूळ, ज्वारी, शेंगदाण्याचे तेल, मीठ, साखर, हळद, मोहरी, जिरे आणि लाल मिरची पावडर यांचा समावेश असेल.

**१६.** 'महारथी (महाराष्ट्र एडवांस रोबोटिक्स अँड AI ट्रेनिंग हब इनिशिएटिव्ह)- अटल टिंकरिंग लॅब्स योजना' सुरू करण्यात येईल, ज्यामधून सर्व शासकीय शाळांमध्ये रोबोटिक्स आणि AI शिकण्याच्या संधी उपलब्ध होतील.

**१७.** महाराष्ट्रात कौशल्य जनगणना (Skill Census) करण्यात येईल ज्यायोगे उद्योगाच्या गरजेनुसार कौशल्यांच्या तुटवड्यांचे विश्लेषण करून त्यावर आधारित उपलब्ध कुशल मनुष्यबळ उपलब्धकरुनदेणे आणि आवश्यकतेप्रमाणे नवीन कुशल मनुष्यबळ उपलब्धीसाठी नियोजन करता येईल.

**१८.** महाराष्ट्रातील प्रत्येक जिल्ह्यात 'छत्रपती शिवाजी महाराज आकांक्षा केंद्र' स्थापन करण्यात येईल, ज्याच्या माध्यमातून १० लाख नवीन उद्योजक तयार केले जातील. या केंद्रांमध्ये को वर्किंग स्पेस आणि इनक्युबेशन सुविधांचा समावेश असेल, जेथे विद्यार्थी, व्यवसायिक आणि उद्योजक एकत्र येऊन, नेटवर्किंग करून, नाविन्यपूर्ण संकल्पानांना चालना देण्यात येईल.

**१९.** अनुसुचित जाती, जमाती आणि इतर मागासवर्गीय उद्योजकांच्या व्यवसाय वृध्दीसाठी रू.१५ लाखपर्यंत व्याजरहित कर्ज देण्यात येईल.

**२०.** ओबीसी, एसईबीसी, ईडब्ल्युएस, एनटी, व्हीजेएनटीमधील पात्र विद्यार्थ्यांना शिक्षण शुल्क आणि परीक्षा शुल्काची प्रतिपूर्ती करण्यात येईल.

**२१.** १८ ते ३५ वयोगटातील तरूणाच्या वार्षिक आरोग्य तपासणीसाठी स्वामी विवेकानंद युवा आरोग्य कार्ड (Youth Health Card) सुरू करण्यात येईल तसेच नशामुक्त-व्यसनमुक्त महाराष्ट्रासाठी कायमस्वरूपी योजना लागू करण्यात येईल.

**२२.** महाराष्ट्रात प्राचीन आणि ऐतिहासिक गड किल्यांची मोठी संख्या आहे. हे गड किल्ले महाराष्ट्राचे वैभव असून महाराष्ट्राच्या ऐतिहासिक व सांस्कृतिक जडणघडणीमध्ये त्यांचा सिंहाचा वाटा आहे. महाराष्ट्राच्या या ऐतिहासिक आणि सांस्कृतिक वारश्याचे जतन व संवर्धन यासाठी गड- किल्ले विकास प्राधिकरण स्थापित करणार.

**२३.** 'ज्येष्ठ नागरिकांना प्राधान्य' धोरण स्वीकारण्यात येईल. ज्यात :

● प्रत्येक ज्येष्ठ नागरिकासाठी स्वयंचलित सेवा मिळवण्यासाठी आधार सक्षम सेवा वितरण (ESD) लागू करणे.

● वय वर्षे ८० व त्यावरील ज्येष्ठ नागरिकांवनी मागणी केलेली कादगपत्रे - जसे की आरोग्य नोंदी, ओळखपत्रे आणि पेन्शन संबंधित कागदपत्रे-थेट त्यांच्या घरी पोहचवण्याची व्यवस्था करण्यात येईल.

● सर्व शासकीय रूग्णासयांमध्ये ज्येष्ठ नागरिकांसाठी स्वतंत्र बाह्यरूग्ण कक्ष (OPD) सुरू करण्यात येतील.

**२४. बळजबरी व फसवून केलेल्या धर्मांतराविरुध्द कठोर कायदा करण्यात येईल. बळजबरी आणि फसवणूक करणाऱ्या धर्मांतरापासून संरक्षण मिळेल.**

**२५.** वनालगत, शेतीमध्ये, मानवी वस्त्यांमध्ये वाघ, बिबट्या, हत्ती, रोही, रानडुक्कर आणि माकड या वन्यप्राण्यांमुळे होणारी जीवित व वित्त हानी टाळण्यासाठी तसेच मानव वन्यजीव संघर्ष कमी करण्यासाठी आर्टिफिशियल इंटेलिजेंस (AI) तंत्रज्ञान, ड्रोन आणि रेडिओ कॉलर यासारख्या आधुनिक तंत्रज्ञानाचा प्रभावी वापर करण्यात येईल. ■

# सर्व समाज घटकांच्या विकासाचे मोदी सरकारचे निर्णय

## मध्यम वर्गाला मोठा दिलासा



● कर दिलासा: ७ लाख रुपयापर्यंतच्या उत्पन्नावर कोणाताही कर नाही.

● वेतनधारक वर्ग १७ हजार ५०० रुपयापर्यंत कर बचत करू शकतात.

● स्टॅंडर्ड डिडक्शनची मर्यादा वाढवून ७५ हजार रुपये केली गेली.

● कौटुंबिक निवृत्ती वेतनामधील सवलत वाढवून २५ हजार रुपये केली गेली.

● प्राप्तीकर नियमांना थोडक्यात-सारांश स्वरूपामध्ये, स्पष्ट आणि समजण्यास सोपे बनविण्यासाठी ६ महिन्यात व्यापक समीक्षा करणार.

## सरकारी कर्मचाऱ्यांना सरकारकडून भेट

● युनिफाइड पेन्शन स्कीमला मंजुरी: २५ वर्ष सेवा पूर्ण करणाऱ्या कर्मचाऱ्यांना सरासरी मूळ वेतनाच्या ५० टक्के निवृत्ती वेतनाच्या स्वरूपामध्ये मिळतील.

## वन रँक, वन पेन्शन (ओआरपी)

● सुरक्षादल आणि त्यांच्या कुटुंबियांना वन रँक, वन पेन्शन योजनेची तिसरी आवृत्ती लागू करण्याचा निर्णय.

## प्रधानमंत्री आवास योजनेअंतर्गत ३ कोटी घरे बांधण्यास मंजुरी

● शहरी योजनेअंतर्गत १ कोटी घरांची निर्मिती.

● ग्रामीण भागामध्ये २ कोटी घरांची निर्मिती करण्यास मंजुरी.

● २०१४ पासून आतापर्यंत (शहरी आणि ग्रामीण) ४.२७ कोटी घरांची बांधणी.


## पीएम सूर्य घर मोफत वीज योजना

● ३.५ लाखांपेक्षा जास्त घरांमध्ये सौर ऊर्जा संयंत्रे लावण्यात आली. मध्यम वर्गाला मिळाली आर्थिक बळकटी.

● पीएम ई-बस सेवामुळे पर्यावरण स्नेही कार्यप्रणाली तयार होईल.

● ३ हजार ४०० कोटी रुपयांच्या मदतीमधून ई-बसगाड्यांची खरेदी केली जाईल.

## पायाभूत सुविधा विकास



● १०० दिवसात ३ लाख कोटी रुपयांच्या प्रकल्पांना मंजुरी.

● ७६ हजार २०० कोटी रुपये खर्चाच्या महाराष्ट्रातील वाढवण मेगा पोर्टला मंजुरी.

● रस्ते, रेल्वे, बंदरे आणि हवाई मार्ग यावर प्रमुख भर.

● हे जगातील आघाडीच्या १० बंदरांमध्ये समाविष्ट होईल.

● ५० हजार ६०० कोटी रुपये खर्चाने भारताच्या रस्ते जाळ्याला बळकटी देणे स्वीकृत.

● ९३६ किलोमीटर विस्तारलेल्या ८ राष्ट्रीय द्रुतगती रस्ते मार्गिका प्रकल्पांना मंजुरी.

## प्रधानमंत्री ग्रामसडक योजना -४ (पीएमजीएसवाय-आयव्ही)

● ४९ हजार कोटी रुपयांच्या केंद्रीय मदतीने २५ हजार संपर्कविरहित गावांमध्ये संपर्कव्यवस्था निर्माण करण्यासाठी ६२ हजार ५०० किलोमीटर रस्ते आणि पुलांची निर्मिती/अद्ययावतीकरण मंजूर.

● लडाखला हिमाचल प्रदेशासोबत जोडणाऱ्या शिन-खुनला बोगद्याची पायाभरणी करण्यात आली.



● रेल्वे प्रवास वेगवान आणि सुविधाकारक बनवण्यासाठी ८ नव्या रेल्वे मार्ग प्रकल्पांना मंजुरी, ज्यामुळे ४.४२ कोटी मानव दिवसांचा रोजगार निर्माण होईल.


● ३० हजार ७०० कोटी रुपये खर्चाने बंगळुरू मेट्रोचा तिसरा टप्पा, पुणे मेट्रो आणि ठाणे इंटिग्रल रिंग मेट्रो रेल्वे प्रकल्पाच्या विस्ताराला मंजुरी.

● वाराणसीमध्ये लालबहादूर शास्त्री आंतरराष्ट्रीय विमानतळाच्या विकासाला मंजुरी.

● अगत्ती आणि मिनीकॉयमध्ये नवी धावपट्टी देखील तयार केली जाईल.

● पश्चिम बंगालमध्ये बागडोगरा आणि बिहारच्या बिहटामध्ये नव्या सिविल एन्क्लेवला मंजुरी.

## शेतकरी मित्र मोदी



● प्रधानमंत्री शेतकरी सन्मान निधीचा १७ वा हप्ता जारी केला.

● २० हजार कोटी रुपये ९.३ कोटी शेतकऱ्यांना वितरीत.

● १२.३३ कोटी शेतकऱ्यांना आतापर्यंत ३ लाख कोटी रुपये वितरीत.

● २०२४-२०२५ च्या खरीप पिकांसाठी एमएसपी वाढवण्यात आली. यामुळे शेतकऱ्यांना सुमारे २ लाख कोटी रूपयापर्यंतचा लाभ (१२ कोटी शेतकऱ्यांना लाभ).

● प्रधानमंत्री अन्नदाता आय संरक्षण अभियान (पीएम-आशा) योजना सुरू ठेवण्याला मंजुरी.

● १२ हजार १०० कोटी रुपये खर्चाने आंध्र प्रदेशातील पोलावरम् सिंचन प्रकल्पाला मंजुरी.

● १४ हजार २०० कोटी रुपयांच्या खर्चाने ७ प्रमुख योजनांना मंजुरी, ज्यामध्ये डिजीटल ॲग्रिकल्चर मिशनचा समावेश. ज्यामुळे कृषी क्षेत्रात कार्यक्षमता आणि उत्पादकता वाढेल.

● राष्ट्रस्तरीय समितीद्वारे तयार नव्या राष्ट्रीय सहकार्य धोरणावर अहवालाचा मसुदा प्राप्त झाला आहे.

● धोरणाचा मसुदा देखील तयार करण्यात आला आहे आणि आता याला अंतिम रूप दिले जात आहे.

● रब्बी पीक हंगाम, २०२४ (०१.१०.२०२४ पासून ३१.०३.२०२५ पर्यंत) साठी फॉस्फेटिक आणि पोटॅशिक पी ॲण्ड के) खतांवर पोषक तत्वांवर आधारीत अनुदान (एनबीएस) दरांना मंजुरी देण्यात आली.

● ३० हजार बचत गटांच्या कृषी सख्यांना शेतीमधील त्यांच्या भूमिकेसाठी पंतप्रधान मोदी यांनी वारासणी दौऱ्याच्या वेळी सन्मानित केले.



● मक्यापासून इथेनॉलच्या उत्पादनासाठी सहकारी साखर गिरण्यांच्या इथेनॉल उत्पादक युनिटचे मल्टी फील्ड इथेनॉल युनिटमध्ये रूपांतरण.

● कांदा आणि बासमती तांदळावरील किमान निर्यातमूल्य (एमईपी) हटवण्याच्या आणि कांद्यावरील निर्यात शुल्क ४० टक्क्यांवरून २० टक्क्यांवर करण्याचा निर्णय.

● कच्चे पाम, सोया आणि सूर्यफूल तेलाच्या आयातीवरील सीमाशुल्क १२.५ टक्क्यांवरून ३२.५ टक्के इतके वाढवण्याचा आणि त्यांच्या रिफाईन्ड तेलांवरील सीमाशुल्क १३.७५ टक्के ३५.७५ टक्के करण्याचा निर्णय.


● कृषी पायाभूत सुविधा बळकट करण्यासाठी ॲग्रीकल्चर इन्फ्रास्ट्रक्चर फंड स्कीमचा विस्तार.

● जम्मू-काश्मीरमध्ये ३ हजार ३०० कोटी रुपये खर्चाने अनेक कृषी योजना आणि विकास प्रकल्प सुरू.

● ॲग्रीस्योर नावाच्या एका नव्या निधीचा प्रारंभ: कृषी क्षेत्रात क्रांती आणण्यासाठी आणि स्टार्ट-अप आणि ग्रामीण इंटरप्रायजेसना पाठबळ देण्यासाठी सुरुवात.

● हंगाम आणि हवामान अनुकूल भारत बनवण्यासाठी २ हजार कोटी रुपयांच्या मिशन मौसमला मंजुरी.

## ईझ ऑफ डुईंग बिझनेस



● स्टार्टअपना वित्तीय दिलासा आणि नवोन्मेषाला प्रोत्साहन देण्यासाठी स्टार्ट अपवर ३१ टक्के चा बोजा टाकणारा २०१२ पासून सुरू असलेला अजंल टॅक्स समाप्त केला.

● परदेशी कंपन्यांसाठी कॉर्पोरेट कर ४० टक्के वरून ३५ टक्के इतका घटवण्यात आला. यामुळे भारताला जागतिक स्तरावर जास्त प्रतिस्पर्धी आणि गुंतवणुकीसाठी आकर्षक बनवण्यात आले.

● साहस भांडवल निधी भारताला जागतिक अंतराळ अर्थव्यवस्थांमधील अग्रणी बनवण्यासाठी आणि अंतराळ क्षेत्रातील स्टार्टअपसाठी तयार करण्यात येईल.

● GENESIS कार्यक्रम:Tier-II आणि Tier-III शहरात स्टार्टअपसाठी जेन-नेक्स्ट सपोर्ट फॉर इनोवेशन स्टार्टअप (GENESIS) कार्यक्रमाला मंजुरी देण्यात आली.

● नॅशनल इंडस्ट्रीयल कॉरिडॉर डेव्हलपमेंट प्रोग्राम अंतर्गत १२ औद्योगिक झोन तयार करण्याची घोषणा.

● जे गुंतवणूकदारांना सुविधा प्रदान करतील आणि व्यवसाय सुलभतेला अधिक चांगले बनवतील.

● मुद्रा कर्जाची मर्यादा १० लाखांवरून वाढवून २० लाख रुपये करण्यात आली.

● यामुळे जुन्या कर्जाची यशस्वीरित्या परतफेड करणाऱ्या व्यापाऱ्यांना फायदा होईल.

● MSMEs साठी कर्ज हमी योजना सुरू करण्यात आली, ज्यामुळे लहान व्यापाऱ्यांना विना तारण कर्ज मिळू शकेल.

● यंत्रसामुग्री आणि इतर सामग्रीची खरेदी करणे त्यांच्यासाठी सुलभ होईल.

● MSMEs आणि पारंपरिक कारागिरांसाठी PPP च्या माध्यमातून ई-कॉमर्स निर्यात केंद्रे तयार करण्यात येईल

● ज्या निर्यात सेवा प्रदान करतील आणि जागतिक बाजारात सुलभ हाताळणी सुविधा देतील.

## ओबीसी, दलित, अल्पसंख्याक आणि आदिवासींचे सक्षमीकरण



**प्रधानमंत्री जनजातीय उन्नत ग्राम अभियान**

● ६३ हजार आदिवासी गावांचा विकास केला जाईल.

● ५ कोटी आदिवासींच्या सामाजिक-आर्थिक स्थितीत सुधारणा होईल.

● NAMASTE योजनेचा विस्तार: सफाई कर्मचाऱ्यांसोबत कचरा वेचणाऱ्यांना देखील समाविष्ट करण्यात आले, ज्यामुळे त्यांचे सामाजिक आणि आर्थिक सक्षमीकरण होईल.

● विशिष्ट दिव्यांगता ओळखपत्र: अनुसूचित जमातीच्या दिव्यांगांना ३ लाख ओळखपत्रे जारी करण्यात आली.

● ज्यामध्ये ६० वर्षे आणि त्यापेक्षा जास्त वयाच्या दिव्यांगांसाठी १.१७ लाख कार्डांचा समावेश आहे.

● PM SURAJ चा विस्तार: अनूसूचित जाती, इतर मागास वर्ग आणि सफाई कर्मचाऱ्यांच्या चरितार्थासाठी सवलतीच्या कर्जांची अधिक चांगल्या प्रकारे उपलब्धता सुनिश्चित होईल.

## वक्फ (सुधारणा) विधेयक २०२४

● वक्फ मालमत्तांचे व्यवस्थापन आणि संरक्षण विचारात घेऊन ऑनलाईन नोंदणी आणि देखरेखसाठी डिजीटल प्लॅटफॉर्म तयार केला जाईल, ज्यामुळे वाद कमी होतील.

● एकलव्य आदर्श निवासी शाळा.

● ४०५ विद्यालयांमध्ये १.२३ लाखांपेक्षा जास्त विद्यार्थ्यांचे नामांकन झाले.

● नवीन शाळा आणि स्मार्ट इयत्ता: ४० नवीन शाळा तयार करण्यात आल्या आणि ११० विद्यालयात आदिवासी विद्यार्थ्यांसाठी स्मार्ट इयत्ता तयार करण्यात आल्या.

## सशक्त सुवा

● २ लाख कोटी रुपये इतक्या रकमेच्या पीएम पॅकेजची घोषणा, ज्यामुळे युवांना रोजगार आणि कौशल्याला चालना मिळेल.

● लक्ष्य: ५ वर्षात ४.१ कोटी युवांना लाभ देणे.

● १ कोटी युवांना आघाडीच्या कंपन्यांमध्ये अंतर्वासितेच्या संधी, allowance आणि एका वेळची मदत रक्कम.



● १५ हजारापेक्षा जास्त नव्या नियुक्त्यांची केंद्र सरकारने घोषणा केली.

● २० लाख युवांना कौशल्य सुक्त बनवण्याचे लक्ष्य १ हजार औद्योगिक शिक्षण संस्थांची सुधारणा होणार.

● ईपीएफओ अंतर्गत समावेश असलेल्या पहिल्यांदाच रोजगार प्राप्त हप्त्यांमध्ये १५ हजार रुपयांपर्यंत प्रोत्साहन भत्ता मिळणार.

● एक लाख रुपयांपर्यंत उत्पन्न असलेल्या कर्मचाऱ्यांना ईपीएफओमध्ये सरकारी योगदानाचा लाभ मिळणार.

● नियोक्त्यांना एक लाख रुपयांपर्यंत उत्पन्न असलेल्या कर्मचाऱ्यांची भरती केल्यास मासिक ३ हजार रुपयांप्रमाणे दोन वर्षे भरपाई मिळणार.

● ई- श्रम पोर्टलचे एकात्मिकरण.

● भांडवली खर्च रु. ११.११ लाख कोटींपर्यंत वाढवून रोजगार निर्मिती.

## लखपती दीदी योजना



● पंतप्रधान मोदी यांनी ११ लाख नव्या लखपती दीदींना प्रमाणपत्रे दिली.

● १ कोटींपेक्षा जास्त लखपती दीदी दरवर्षी एक लाख रुपयांपेक्षा जास्त कमाई करत आहेत.

● पर्यटन दीदी आणि पर्यटन मित्रांच्या माध्यमातून SHGs आणि युवांना पर्यटनाशी जोडले.

● ५ हजार कोटी रुपयांचे बँक कर्ज जारी.

● २.३५ लाख SHGs च्या २५.८ लाख सदस्यांना लाभ

● २० लाख रुपये करण्यात आली मुद्रा कर्जाची रक्कम, पूर्वी १० लाख रुपये होती.

● २ हजार ५०० कोटी रुपयांचा Community Investment Fund जारी.

● ४.३ लाख SHGs च्या ४८ लाख सदस्यांना लाभ.

● स्टार्ट अप आणि MSME साठी आर्थिक आणि कर प्रोत्साहन.

● खेलो इंडिया राइजिंग टॅलेन्ट आयडेन्टीफिकेशन (KIRTI) योजनेचा प्रारंभ.

● दीनदयाळ अंत्योदय योजना (DY- NRLM²) अंतर्गत १० कोटी पेक्षा जास्त महिलांना संघटित करुन त्यांचा चरितार्थ, डिजिटल साक्षरता आणि सामाजिक विकासाकरिता ९० लाखांपेक्षा जास्त बचत गट (SHGs) बनवण्यात आले.

## सुलभ आरोग्य सेवा

### आयुष्यमान भारत योजनेचा विस्तार



● ७० किंवा त्यापेक्षा जास्त वयाच्या सर्व वृध्द नागरिकांना ५ लाख रुपयांपर्यंत मोफत आरोग्य विमा.

● ४.५ कोटी कुटुंबातल्या ६ कोटी वृध्द नागरिकांना लाभ होईल.

● ७५ हजार नव्या वैद्यकीय जागा वाढवण्यात आल्या ज्यामुळे आरोग्य सेवा व्यवस्था प्रभावी करण्यासाठी आणि वैद्यकीय शिक्षण क्षेत्रात परदेशावरचे अवलंबित्व कमी करण्यासाठी मदत होईल.

● नियमित लसीकरण डिजिटल करण्यासाठी U- WIN पोर्टल सुरू करण्यात आले.

● देशात डॉक्टरांचे मध्यवर्ती डेटा भांडार करण्यासाठी राष्ट्रीय वैद्यकीय आयोग एक राष्ट्रीय वैद्यकीय रजिस्टर तयार करत आहे.

● महिला, किशोरी आणि आदिवासी समाजात सिकल सेल आजाराविषयी जागरुकता वाढवण्यासाठी विशेष अभियान चालवण्यात आले.

● कर्क रुग्णांवरचे आर्थिक ओझे कमी करण्याच्या दृष्टिने कर्क रोगावरच्या तीन औषधांना सीमा शुल्कातून सूट.

● १० हजार ९०० कोटी रुपये पीएम ई ड्राईव्ह योजना खचून इलेक्ट्रिक ॲम्ब्युलन्सची सुविधा प्रदान करण्यात येईल.

## डिजिटल आरोग्य सुविधा

● आयुष्मान भारत आरोग्य खात्यावर (BH) 'स्कॅन आणि शेअर' सुविधा.

● या माध्यमातून कोटी बाह्य रुग्ण नोंदणीची सुविधा देण्यात आली.

# खोट्या प्रचाराची हवा संपली महायुतीच बहुमत मिळवणार



उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी अलिकडेच टाइम्स ऑफ इंडिया या वृत्तपत्राला दिलेल्या मुलाखतीत विविध विषयांवर भाष्य केले आहे तसेच पक्षाची भूमिकाही स्पष्ट केली आहे. या मुलाखतीचा संक्षिप्त अंश.

**प्रश्न: विधानसभा निवडणुकीत महायुतीला बहुमत मिळण्याच्या शक्यतेबद्दल तुम्हाला काय वाटते?**

**उत्तर:** महाराष्ट्रातील मतदारांनी महायुती सरकारलाच पुन्हा सत्तेत आणण्याचा निर्णय घेतला आहे, असे राज्यभर केलेल्या प्रवासातून मला दिसून आले आहे. महायुती सरकारच्या काळात राज्याच्या विकासाला मिळालेली गती आणि त्याचे परिणाम याचा अनुभव राज्यातील जनतेने घेतला आहे. आमच्या सरकारने कोरडी आश्वासने कधीच दिली नाहीत. दिलेली आश्वासने आमच्या सरकारने पूर्ण केली आहेत. त्यामुळेच मतदार आम्हाला पुन्हा कौल देतील, असा विश्वास मला आहे.

वैनगंगा–नळगंगा नदीजोडसारखा प्रकल्प, मराठवाड्यासाठी ५४ टीमएसी पाणी आणण्याचा वॉटरग्रीड प्रकल्प आम्ही पुन्हा सुरू केला. या दोन्ही प्रकल्पांमुळे विदर्भ आणि मराठवाड्याचे चित्र पूर्णत: बदलणार असून हा भाग सुजलाम सुफलाम होणार आहे. वाढवण बंदरासारख्या जगातील सर्वात मोठ्या बंदरांपैकी एक असलेल्या बंदराचे काम आमच्या सरकारने सुरू केले आहे.

या प्रकल्पामुळे मोठ्या प्रमाणात रोजगारनिर्मिती होणार आहे. अशा अनेक विकासकामांमुळे महायुती सरकारबद्दल मतदारांच्या मनात विश्वास निर्माण झाला आहे. त्याचबरोबर लाडकी बहीणसारखी योजना सुरू झाल्यामुळेही महायुती सरकारबद्दल सकारात्मक भावना निर्माण झाली आहे.

**प्रश्न: काँग्रेस नेते राहुल गांधी आरक्षण आणि संविधानाच्या मुद्यावरून भारतीय जनता पार्टीला सातत्याने लक्ष्य करत आहेत ? त्याबद्दल तुम्हाला काय म्हणावयाचे आहे.**

**उत्तर:** राहुल गांधी हे काँग्रेसचे राहिलेले नाहीत, असे त्यांच्या भोवती जमलेल्या शहरी नक्षलवाद्यांच्या कोंडाळ्यावरून दिसते आहे. शहरी नक्षलवादी मंडळी विविध जाती-धर्मात संघर्ष निर्माण करून, वेगवेगळ्या विकास प्रकल्पात अडथळे आणून देशाच्या विकासाचा मार्ग रोखत आहेत. हीच मंडळी राहुल गांधी यांची राजकीय भूमिका ठरवत आहेत.

'संविधान बदल'सारखा खोटा प्रचार याच मंडळींनी केला. राहुल गांधी हे लाल पुस्तकाला संविधान म्हणून संबोधतात. मात्र या पुस्तकाच्या आतील पाने पूर्णपणे कोरी असतात. यातून राहुल गांधी हे भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या संविधानाचा अपमान करतात. या लाल पुस्तकाप्रमाणे काँग्रेसला भारताचे संविधानही कोरे करायचे आहे. डॉ.आंबेडकरांनी तयार केलेले सर्व कायदे, अनुच्छेद रद्द करावयाचे आहेत. त्यामुळेच मध्यतरी आपल्या अमेरिका दौऱ्यात राहुल गांधी यांनी आरक्षण रद्द करण्याची भाषा केली होती.

राहुल गांधीच्या जे पोटात आहे तेच अपघाताने त्यांच्या तोंडात आले. देशविरोधी मंडळी अवतीभोवती वावरत असल्यामुळे राहुल गांधी भारतीय जनता पार्टीच्या विरोधात आणि केंद्रातील मोदी सरकारच्या विरोधात खोटा प्रचार करत आहेत. राहुल गांधी यांनी भारत जोडो यात्रा सुरू केली तेव्हा आम्हाला त्या यात्रेचे कौतुकच वाटले होते. यानिमित्ताने का होईना राहुल गांधींना 'भारता'ची आठवण झाली, असे आम्हाला वाटले.

मात्र या यात्रेच्या आयोजनात ज्या १८० संस्था आणि संघटनांनी सहभाग घेतला होता. त्यांची नावे पाहिल्यावर राहुल गांधी यांना देशात अशांतता, अस्थैर्य निर्माण करणाऱ्या शक्तींचा पाठिंबा आहे, हे स्पष्ट झाले होते. त्यामुळेच राहुल गांधी संविधान म्हणून जे पुस्तक दाखवतात त्या पुस्तकाचा रंग लाल असावा. राहुल गांधींची भाषा संविधान बचाव, लोकशाही बचाव अशा पद्धतीची असते.

मात्र लोकशाहीचा चौथा स्तंभ असलेल्या पत्रकारांना राहुल गांधींच्या नागपूरमधील कार्यक्रमातून बाहेर काढले गेले. संविधान आणि लोकशाही प्रेमाचा राहुल गांधी यांचा मुखवटा जनतेला कळला आहे. त्यामुळेच संविधान




बदलसारख्या खोट्या प्रचाराला मतदार बळी पडणार नाहीत, असे चित्र विधानसभा निवडणुकीत दिसते आहे.

**प्रश्न: राष्ट्रीय स्वयंसेवक संघ विधानसभा निवडणुकीत भारतीय जनता पार्टीसाठी ताकदीने काम करत असल्याचे बोलले जात आहे. याबद्दल तुम्हाला काय म्हणवायचे आहे ?**

**उत्तर:** राष्ट्रीय स्वयंसेवक संघ ही संघटना कोणत्याच पक्षाच्या बाजूने प्रचारात उतरत नसते. राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या अनेक स्वयंसेवकांशी मी नियमित संपर्कात असतो. रा.स्व.संघ प्रत्यक्षात राजकारणात भाग घेत नाही. मात्र या निवडणुकीत आम्ही देशात अशांतता निर्माण करणाऱ्या व्होट जिहादसारख्या प्रवृत्तींविरोधात सहकार्य करण्याचे आवाहन संघ परिवारातील संघटनांना केले आहे. या व्होट जिहादी मंडळींनी लोकसभा निवडणुकीत केलेले उद्योग संपूर्ण देशाने पाहिले आहे. आमचा लढा काँग्रेसशी नसून काँग्रेसमध्ये शिरकाव केलेल्या देशविरोधी शक्तींशी आहे. काँग्रेसच्या यंत्रणेत घुसलेल्या या देशविरोधी शक्तींच्या खोट्या प्रचाराला उत्तर देण्यासाठी आम्ही संघ परिवाराची मदत मागितली आहे.

**प्रश्न: काही दिवसांपूर्वी झालेल्या जनमत चाचण्यामध्ये महाविकास आघाडी बाजी मारणार, असे दिसले होते.**

**उत्तर:** जनमत चाचण्यांना (ओपिनियन पोल) अनेक मर्यादा असतात. लोकसभा निवडणुकीत मोदी सरकार आणि महायुती सरकार विरोधात मोठ्या प्रमाणात खोटा प्रचार केला गेला. त्याचा प्रभाव मतदारांवर पडला हे नाकारता येत नाही. लोकसभा निवडणुकीनंतर लगेचच या जनमत चाचण्या झाल्या होत्या. त्यामुळे त्या चाचण्यांमध्ये आघाडीच्या बाजूने कल असल्याचे दिसले होते. लोकसभा निवडणुकीतील खोट्या प्रचाराचा प्रभाव पूर्णपणे संपला असून राज्यात आता महायुतीच्या बाजूने वातावरण आहे, असे मी खात्रीपूर्वक सांगू शकतो. लोकसभा निवडणुकीनंतर आम्ही आमच्यात काही बदल घडवले. त्याप्रमाणे निर्णयही घेतले गेले. मोदी सरकार पुन्हा सत्तेत आल्यास संविधान बदलले जाणार या खोट्या प्रचाराचे आयुष्य अल्पकाळात संपले. राहुल गांधी यांनी अमेरिकेत जावून आरक्षण रद्द करण्याची भाषा केली होती. त्यातून काँग्रेस आणि राहुल गांधींचा खरा चेहरा मतदारांना कळून चुकला. लोकसभा निवडणुकीत व्होट जिहादचा प्रयोग करून धार्मिक ध्रुवीकरण करण्याचे प्रयत्न झाले. त्यासाठी फतवे काढले गेले. परंतु आता अल्पसंख्यकांना आपली दिशाभूल करण्यात आली हे कळून चुकेल आहे. काँग्रेसच्या उमेदवारांमध्ये किती मुस्लिम आहेत? मुस्लिम समाजाला आपला वापर भारतीय जनता पार्टी विरोधात करून घेतला गेला. हे कळून चुकले आहे. विधानसभा निवडणुकीत मुस्लिम समुदाय व्होट जिहादसारख्या आवाहनाला बळी पडणार नाही, असे मला वाटते.

**प्रश्न: व्होट जिहादबद्दल थोडे आणखी सांगू शकाल का?**

**उत्तर:** व्होट जिहादमुळे लोकसभा निवडणुकीत महायुतीचा १० जागांवर पराभव झाला. धुळे मतदारसंघातील ५ विधानसभा मतदारसंघात भारतीय जनता पार्टी उमेदवाराला १.९० लाख मतांची आघाडी होती. मात्र मालेगाव मध्य या विधानसभा मतदारसंघात काँग्रेस उमेदवाराला १ लाख ९४ हजार मतांची आघाडी मिळाली. त्यामुळे भाजपा उमेदवार ४ हजार मतांनी पराभूत झाला. अशा पद्धतीने धार्मिक ध्रुवीकरण करून निवडणुकीत विजय मिळवणे देशासाठी अत्यंत घातक आहे. त्यामुळेच या व्होट जिहादविरोधात जागृती करण्याचे काम राष्ट्रवादी शक्तींकडून



सुरू आहे. भारतीय जनता पार्टीचा मुस्लिम धर्मियांना विरोध नाही. मात्र मतांसाठी मुस्लिम धर्मियांचे लांगूल चालन करणाऱ्याला आमचा विरोध आहे.

**प्रश्न: मनोज जरांगे नेहमी तुम्हाला लक्ष्य करत असतात याचे कारण काय?**

**उत्तर:** मनोज जरांगे दिवसातून तीनवेळेला माझ्यावर टीका करत असतात. भारतीय जनता पार्टी हा महायुतीतील सर्वात मोठा पक्ष असल्याने माझ्यावर आणि भाजपावर ते टीका करत असावेत. मराठा आरक्षणाचा प्रश्न दीर्घकाळ महाराष्ट्रात सत्ता असलेल्या काँग्रेसने आणि शरद पवार यांनी सोडवला नाही. माझ्या सरकारने मराठा समाजाला कायद्याद्वारे आरक्षण दिले. सर्वोच्च न्यायालयाने पहिल्या सुनावणीत आमच्या सरकारचा मराठा आरक्षणाचा कायदा रद्द केला नव्हता. मात्र उद्धव ठाकरेंचे सरकार आल्यावर त्यांना सर्वोच्च न्यायालयात योग्य पद्धतीने बाजू मांडून मराठा आरक्षण टिकवता आले नाही. ही वस्तुस्थिती आहे. मराठा समाजाच्या कल्याणासाठी आमच्या सरकारने सारथी महामंडळ, अण्णासाहेब पाटील आर्थिक विकास महामंडळाच्या माध्यमातून अनेक निर्णय घेतले. अण्णासाहेब पाटील महामंडळाने केलेल्या कर्जपुरवठ्यातून मराठा समाजातील १ लाख उद्योजक तयार झाले आहेत. १९८२ मध्ये अण्णासाहेब पाटील यांनी मराठा आरक्षणाची मागणी सर्वप्रथम केली होती. तेव्हापासून २०१४ पर्यत काँग्रेस सरकार बहुतांश काळ महाराष्ट्रात सत्तेत होते. काँग्रेसच्या सरकारांनी आरक्षण तर दिलेच नाही शिवाय मराठा समाजाच्या कल्याणासाठी ठोस निर्णयही घेतले नाही. आमच्या सरकारने आरक्षणाचा कायदा करूनही आमच्यावर टीका होते आहे, हे दुर्देवी आहे. ■

# काँग्रेस आणि बोलका पत्थर

विधानसभा निवडणुकीसाठी काँग्रेस आणि शरद पवार गट आणि उबाठा यांचा संयुक्त जाहीरनामा नुकताच प्रसिद्ध झाला आहे. या जाहीरनाम्यात मतदारांवर आश्वासनांची खैरात करण्यात आली आहे. काँग्रेसने लोकसभा निवडणूक आणि त्याआधी कर्नाटक, हिमाचल प्रदेश आणि तेलंगण विधासनभा निवडणूक याच पद्धतीने मतदारांवर आश्वासनांचा आणि घोषणांचा पाऊस पाडला होता. कर्नाटक, हिमाचल प्रदेश आणि तेलंगणमध्ये काँग्रेसला सत्ता मिळाली. सत्तेत आल्यानंतर काँग्रेसने मतदारांना दिलेल्या आश्वासनांची किती पूर्ती झाली, याचा लेखा-जोखा मांडल्यावर काँग्रेसच्या आश्वासनांमागे दडलेली लबाडी कळून येते.

**महायुती** सरकारने लाडकी बहीण योजना जाहीर करून या योजनेचे तीन हप्तेही लाभार्थी महिलांच्या खात्यात जमा केले. या योजनेला सर्वसामान्य महिला वर्गाकडून मिळालेला प्रचंड प्रतिसाद पाहून महाविकास आघाडीच्या नेत्यांच्या पोटात गोळा उठला. वेगवेगळ्या मार्गांनी या योजनेच्या मार्गात अडथळे आणण्याचे प्रयत्न झाले, या योजनेला बदनाम करण्याचे प्रयत्न झाले. 'महायुती सरकार महिलांना भीक घालत आहे', अशा शब्दात महाविकास आघाडीच्या वाचाळविरांनी या योजनेवर टीका केली होती. कर्नाटक, हिमाचल प्रदेश आणि तेलंगण या राज्यांमध्ये काँग्रेसने आपल्या जाहीरनाम्यात कोणती आश्वासने दिली होती आणि त्याची सद्यस्थिती काय आहे, याचा थोडक्यात

**● महाविकास आघाडीच्या जाहीरनाम्यात महिलांना महालक्ष्मी योजनेखाली दरमहा ३ हजार रुपये आणि मोफत बस प्रवास, असे आश्वासन देण्यात आले आहे. कर्नाटकमध्ये काँग्रेसने विधानसभा निवडणुकीत असेच आश्वासन दिले होते. उद्धव ठाकरे मुख्यमंत्री असताना कोरोना काळात अडचणीत सापडलेल्या गोरगरीब श्रमिकांना, कष्टकऱ्यांना एका दमडीची मदत मविआ सरकारनकडून दिली गेली नाही. कोरोना संकटाच्या काळात उत्तर प्रदेश, मध्य प्रदेश यासारख्या अनेक राज्यांनी हातावर पोट असणाऱ्या कष्टकऱ्यांना रोख मदत केली होती. मात्र उद्धव ठाकरेंनी त्या संकट काळात अडचणीत सापडलेल्या कष्टकरी, श्रमिकांना मदत दिली नाही. २०१९ मध्ये अवकाळी पावसाने महाराष्ट्रातील शेतकऱ्यांना मोठा फटका दिला होता. त्यावेळी उद्धव ठाकरेंनी हेक्टरी ५० हजार रुपये नुकसान भरपाईची मागणी काळजीवाहू फडणवीस सरकारकडे केली होती. काँग्रेस-राष्ट्रवादीबरोबर सरकार स्थापन केल्यानंतर उबाठांना या मागणीचा विसर पडला. त्यामुळे मविआची आश्वासन म्हणजे बोलाचा भात आणि बोलाचीच कढी आहे.**

आढावा घेऊ. हिमाचल प्रदेश निवडणुकीत काँग्रेसने राज्य सरकारी कर्मचाऱ्यांना जुनी निवृत्ती वेतन योजना लागू करू, महिलांना दरमहा १५०० रुपये भत्ता देऊ, दूध उत्पादकांना ८० ते १०० प्रति लीटर एवढा भाव देऊ, १५ वर्षासाठी टॅक्सी चालकांना परवाना देऊ, फिरती आरोग्य केंद्रे सुरू करू अशी आश्वासने दिली होती. भारतीय जनता पार्टीने राज्याची आर्थिक स्थिती लक्षात घेऊन जुनी निवृत्ती वेतन योजना चालू करण्याबाबत आश्वासन दिले नव्हते. हिमाचल प्रदेशमधील निवृत्ती राज्य सरकारी कर्मचाऱ्यांची मोठी संख्या पाहता काँग्रेसला जुन्या निवृत्ती योजनेबाबतच्या आश्वासनाचा साहजिक फायदा झाला. सत्तेत आल्यानंतर काँग्रेसला जुन्या निवृत्ती वेतन योजनेबाबत दिलेले आश्वासन पूर्ण करता आले नाही. हिमाचल प्रदेश सरकारची आर्थिक स्थिती अत्यंत बिकट असल्यामुळे तेथे राज्य सरकारी कर्मचाऱ्यांना दरमहा

नियमीत वेतनही मिळत नाही, अशी स्थिती आहे. दूध उत्पादकांना ८० ते १०० रुपये असा दर देण्याचे आश्वासनही काँग्रेसला पूर्ण करता आले नाही. तेथे दूध उत्पादकांना ४५-५५ रुपये प्रति लीटर एवढाच भाव मिळत आहे. १५ वर्षाच्या टॅक्सी परवाना देण्याची घोषणाही पूर्ण होऊ शकली नाही. हिमाचल प्रदेश सरकारच्या तिजोरीत एवढा खडखडाट झाला आहे की, राज्य मंत्रिमंडळ सदस्यांना दोन महीने कोणत्याही प्रकारचा भत्ता दिला जाणार नाही, आमदारांना वेतन दिले जाणार नाही, मंत्री आणि आमदारांवर कोणत्याही प्रकारचे खर्च सरकारी तिजोरीतून केले जाणार नाहीत, असे हिमाचल प्रदेश सरकारला जाहीर करावे लागले. महिलांना दरमहा १५०० रुपये देण्याची काँग्रेसची घोषणाही हवेतच विरली. सर्वसामान्य नागरिकांना भूलवणारे आणखी एक आश्वासन काँग्रेसने हिमाचल प्रदेशमध्ये दिले होते. हे आश्वासन होते घरगुती वीज ग्राहकांना दरमहा ३०० युनिट वीज मोफत देण्याचे. काँग्रेस सत्तेत येऊन २ वर्षे झाली. तरीही काँग्रेसला मोफत वीज देण्याचे आश्वासन पूर्ण करता आले नाही. कर्नाटकमध्ये काँग्रेसने सर्वसामान्य नागरिकांना अन्न भाग्य योजनेखाली दरमहा १० किलो तांदुळ मोफत देण्याचे आश्वासन दिले होते. कर्नाटकच्या शेतकऱ्यांना दररोज ८ तास हमखास वीजपुरवठा केला जाईल, अंगणवाडी सेविकांना दरमहा १५ हजार रुपये एवढे मानधन दिले जाईल आदी आश्वासने दिली होती. सत्तेत येऊन दीड वर्षे झाली तरीही कर्नाटकातील सिद्धरामैय्या सरकारला या आश्वासनांची पूर्तता करता आली नाही.

तेलंगणमध्ये गोरगरिबांना दरवर्षी ६ गॅस सिलेंडर मोफत देणारी महालक्ष्मी योजना, अनूसूचित जातीच्या शेतकऱ्यांना दरमहा २०० युनिट वीज मोफत, १७ पिकांना किमान आधारभूत किंमत लागू करणार, शेतकऱ्यांचे २ लाखापर्यंतचे कर्ज माफ करणार, बेरोजगार युवकांना दरमहा ३ हजार रुपये उदरनिर्वाह भत्ता देणार आदी आश्वासने काँग्रेसने आपल्या जाहीरनाम्यात दिली होती. यापैकी दरवर्षी ६ गॅस सिलेंडर देण्याची योजना अजून सुरू होऊ शकलेली नाही. अनूसूचित जातीच्या शेतकऱ्यांना दरमहा २०० युनिट वीज मोफत देण्याची घोषणाही पूर्ण होऊ शकलेली नाही. पीक कर्ज माफ करण्याची घोषणा पूर्ण केली नाही म्हणून तेलंगणचे मुख्यमंत्री रेवंत रेड्डी यांच्या पुतळे जाळण्याच्या घटना तेलंगणमध्ये घडल्या. तेलंगणमध्ये जनतेला वीज भारनियमनाच्या संकटाशी सामना करावा लागता आहे. लोकसभा निवडणुकीत राहुल आणि प्रियंका गांधी या बहीण-भावांनी काँग्रेस उमेदवाराला निवडून दिल्यास ५ जूनपासून (निकालाच्या दुसऱ्या दिवसापासून) महिलांच्या खात्यात दरमहा ८ हजार ५०० रुपये म्हणजे वर्षाला १ लाख टाकण्याचे आश्वासन दिले होते. त्यासाठी गॅरंटी कार्डही छापून घेतले होते. या कार्डवर मतदारांनी आपले नाव टाकायचे आणि काँग्रेसच्या कार्यालयात ते कार्ड द्यायचे, असे प्रचारसभांमधून सांगितले जात होते. कार्डवर नाव वगैरे माहिती टाकण्याच्या प्रक्रियेमुळे सामान्य मतदारांचा या गॅरंटी कार्डवर पडकन विश्वास बसला. या आश्वासनावर विश्वास ठेऊन काँग्रेसच्या कार्यालयासमोर मुस्लिम महिलांनी लावलेल्या रांगांची छायाचित्रेही प्रसिद्ध झाली होती. एकाही गरीब महिलेच्या खात्यात राहुल गांधींनी आश्वासन दिल्याप्रमाणे पैसे जमा झाले नाहीत.

हरयाणात काँग्रेसने अशाच पद्धतीने मतदारांना आकर्षित करण्यासाठी अनेक आश्वासने दिली. मात्र हरयाणाच्या मतदारांनी त्यावर विश्वास न ठेवता काँग्रेसला पराभूत करत भारतीय जनता पार्टीला पुन्हा सत्तेत बसवले. कर्नाटकात दिलेले आश्वासने पूर्ण करताना सिद्धरामय्या सरकारच्या नाकीनऊ आले आहेत. हा अनुभव लक्षात घेऊन पूर्ण करता येतील, अशीच आश्वासने द्या, असा सल्ला काँग्रेस अध्यक्ष मल्लिकार्जुन खर्गे यांनी महाराष्ट्रातल्या काँग्रेस नेत्यांना दिल्या असल्याबाबतचे वृत्त मध्यंतरी प्रसिद्ध झाले होते. काही वर्षांपूर्वी 'बोलका पत्थर' या नावाने अंगठीतील खड्याच्या जाहिराती प्रसिद्ध झाल्या होत्या. २० रुपयांचा का खडा बोटात घातल्यास आपल्या आयुष्यातील सर्व संकटे दूर होतील, असे सांगितले गेले होते. या जाहिरातींना भुलून अनेकांनी हा खडा खरेदी केला होता. काँग्रेसच्या जाहिरनाम्यातील आश्वासने या बोलक्या पत्थरप्रमाणेच आहेत. राहुल गांधींच्या आजीने म्हणजे इंदिरा गांधी यांनी १९७१च्या लोकसभा निवडणुकीत 'गरिबी हटाओ', असे आश्वासन दिले होते. त्यावर विश्वास ठेऊन भारतीय मतदारांनी १९७१ च्या निवडणुकीत इंदिरा गांधींच्या नेतृत्वाखाली काँग्रेसला प्रचंड बहुमताने सत्तेत बसवले होते. काँग्रेसला आश्वासने देऊन मतदारांना फसवण्याची अनेक वर्षांपासूनची सवय आहे. आताचा मतदार काँग्रेसच्या या बोलक्या पत्थराला दूरच ठेवेल, यात काही शंका नाही. ■

# भारताची चौथी आण्विक पाणबुडी




● काशीनाथ देवधर

> भारताच्या चौथ्या आण्विक पाणबुडी SSBM S4* चे गेल्याच आठवड्यात जलावतरण झाल्याची मोठी बातमी भारतीय नौसेना उपप्रमुख, व्हाईस ॲडमिरल कृष्णस्वामीनाथन यांनी नवी दिल्लीतील पत्रकार परिषदेत सांगितली. भारताची समुद्रशक्ति वाढत आहे हे सर्व जगाला विदित आहेच. आण्विक पाणबुडी SSBM S4* ही अरिहंत वर्गातील चौथी स्वदेशी आण्विक पाणबुडी आहे.

**(SSBN** = Ship, Submersible, Ballistic, Nuclear) जिचे जलावतरण, जहाज बांधणी केंद्र विशाखापट्टण येथे करण्यात आले. या बांधणीमध्ये मोठा वाटा भारतीय उद्योगांचा, असून ते 'आत्मनिर्भर भारत'चे भक्कम उदाहरण आहे. मोदी सरकारचे आत्मनिर्भर भारत हे मिशन मोडमध्ये काम सुरु असून त्यासाठी कधीच निधी कमी पडू दिला जात नाही आणि हेच मोदी सरकारचे बलस्थान आहे. त्या मुळेच भारताची वाटचाल आर्थिक महासत्तेकडेही जोमाने सुरु आहे. त्याच बरोबर निदान संरक्षण क्षेत्रात तरी परकीय शक्तींवर अवलंबून राहायला नको ही जमेची बाजू. त्याचबरोबर संरक्षण सामुग्री व शस्त्रास्त्रे यांच्या स्वदेशी उत्पादनांना दिलेले प्राधान्य ही सामरिक महत्त्वाची गोष्ट साध्य होतेय. विशेषत: इंडो–पॅसिफिकमध्ये आपली सागरी सुरक्षा बळकट करण्यावर भारताचा भर आहे.

भारतीय नौदलाच्या सेवेमध्ये सध्या पहिल्या दोन आण्विक पाणबुड्या आहेत. तिसऱ्या पाणबुडीच्या समुद्री चाचण्या सुरू असून पुढच्या वर्षी ती सेवेमध्ये संमिलित होईल. पहिली पाणबुडीची वाच्यता न करता ऑगस्ट २०१६ मध्ये ती नौसेनेमध्ये सामावून घेतली. ही पाणबुडी ६ हजार टन पाण्याचे विस्थापन करणारी, या पाणबुडी साठी ८३ MW क्षमतेच्या दाबयुक्त हलके पाणी अणुभट्टी (pressurised light- water reactor) सक्षम युरेनियम (enriched uranium) इंधनाचा उपयोग केला जातो. ही पाणबुडी सध्या ७५० किमी पल्ला असणारे, पाण्याखालून डागता येणारे बॅलेस्टिक क्षेपणास्त्र SLBM[2] K-15 यांनी शस्त्र सज्ज आहे.

१९८३ च्या दरम्यान स्वदेशी आण्विक पाणबुडी तंत्रज्ञान विकसित करून पाणबुडीचे आरेखन, अभिकल्पन व बांधणी करण्याची योजना TV (Advanced

Technology Vessle) बनवली व ते काम २५ वर्षांनंतर पूर्ण झाले. आण्विक पाणबुडीमुळे भारताच्या 'आश्वासक न्यूनतम अण्वस्त्र संपन्नता आणि शक्ति संतुलन' (Credible Minimum Nuclear Deterrent) साठी तीन पैकी एक महत्वाचा मार्ग सिद्ध झाला आहे. अण्वस्त्रे डागणारी / अण्वस्त्रे सज्ज पाणबुडी तयार करून हा ही एक टप्पा पूर्ण केला आहे.

आश्वासक न्यूनतम अण्वस्त्र संपन्नता आणि शक्ति संतुलन साधण्या साठी भारताने १९९८ च्या मे महिन्यात अण्वस्त्रांच्या पाच यशस्वी चाचण्या केल्या आणि भारत अण्वस्त्रधारी देश बनला. अणूबॉम्ब, हायड्रोजन बॉम्ब, लघु अणूबॉम्ब साठीचे सर्व तंत्रज्ञान विकसित करून ते आत्मसात केल्याचे म्हणजे अणु-विखंडन आणि अणु-संमीलन तंत्रज्ञान (Fission Fusion Technology) विकसित करून सिद्ध केल्याचे जगाला दाखवले.

अणुबॉम्ब / अण्वस्त्रे आहेत पण ते शत्रूलक्ष्यावरी मारा करण्यासाठीची यंत्रणा (Delivary System) सुद्धा आवश्यक असतात. भारताने तीन महत्वाचे मार्ग ठरवले. पहिला मार्ग म्हणजे लढावू विमानाद्वारे ड्रॉप बॉम्ब (Drop Bomb) च्या स्वरूपात अण्वस्त्रे डागण्याची क्षमता विकसित केली आहेच.

दुसरा मार्ग म्हणजे क्षेपणास्त्र प्रणाली द्वारे अण्वस्त्रे डागण्याची क्षमता विकसित केली. डॉ. कलामांच्या नेतृत्वामध्ये भारताने अग्नी क्षेपणास्त्रे मालिका विकसित करून हे दोन्ही महत्वाचे मार्ग पूर्ण केले होते.

तिसरा मार्ग म्हणजे आण्विक पाणबुडीच्या माध्यमातून अण्वस्त्रे डागण्याची क्षमता विकसित केली. भारताने पाणबुडीवरून डागण्यात येणाऱ्या क्षेपणास्त्रांना 'K-series' म्हणजेच डॉ. कलामांच्या सन्मानार्थ "K" हे नाव दिले आहे. ही क्षेपणास्त्रे आपल्या अरिहंत वर्गाच्या पाणबुडीवरून डागण्याची यंत्रणा निर्माण केली आणि आता हा तिसरा मार्गही प्रशस्त केला आहे.

भानौपो-अरिहंत (भारतीय नौसेना पोत - INS Indian Naval Ship) व भानौपो-अरिघात या दोन्ही पाणबुड्या भारतीय नौसेनेच्या सेवेत आहेत। अण्विक पाणबुडीचा विकास व निर्माण हे DRDO, BRC, Navy, DPSU, आणि खाजगी उद्योग यांच्या एकत्रित सुदृढ प्रयत्नांतून साकार झाले असून गेल्या वर्षात आत्मनिर्भर भारतचे यशस्वी उदाहरण झाले आहे. तिसरी आण्विक



पाणबुडी भानौपो-अरिदमन (INS ridhaman) जिच्या सध्या समुद्री चाचण्या सुरु असून पुढील वर्षी ती नौसेनेच्या सेवेत दाखल होईल.

SSBM² S4* भारताच्या चौथ्या आण्विक पाणबुडी ही आधीच्या दोन्ही पाणबुड्यांपेक्षा अधिक मजबूत, सुरक्षित आणि खात्रीपूर्वक बदला घेण्याची क्षमता असणारी पाणबुडी आहे. आधीच्या पाणबुडीपेक्षा SSBN-S4* ही अधिक मोठी, सुधारीत अणुभट्टीसह, अनेक क्षेपणास्त्रे धारण क्षमता आणि अधिक चांगले स्टील्थ तंत्रज्ञान असणार आहे. 6 X 533 mm टॉर्पेडो ट्यूब, 4 VLS (Verticle Launch System) मधून K-15 SLBM² प्रकारची १२ क्षेपणास्त्रे किंवा K-4 SLBM² प्रकारची ४ क्षेपणास्त्रे अण्वस्त्रे डागण्याची क्षमता विकसित केली.

INS अरिहंत ७५० किमी पल्ल्याच्या K-15 आण्विक क्षेपणास्त्रांचे वहन करते, तर S4* मध्ये ३ हजार ५०० किमी पल्ल्याचे प्रगत K-4 SLBM² आहे ज्याची २०२० मध्ये प्रथम चाचणी घेण्यात आली होती. ही क्षेपणास्त्रे प्रगत उभ्या प्रणालींद्वारे प्रक्षेपित करण्यासाठी डिझाइन केलेली आहेत, पाणबुडीची परिचालन क्षमता आणि धोरणात्मक प्रतिकार वाढवतात. S4* हे त्याच्या पूर्ववर्तींमधील एक महत्त्वपूर्ण अपग्रेड आहे आणि भारतच्या क्रेडिबल मिनिमम डेटरन्स (CMD) धोरणात योगदान देते. ■

# भारतीय विकासाची कथा

● प्रा. डॉ. शैलजा देसाई

> सध्या जगात मंदीचे वातावरण असूनही भारताकडे मात्र आशावादी दृष्टीने पाहिले जाते. या आशावादाच्या कारणांची ही मीमांसा...

**गुंतवणुकीला** सुयोग्य ठिकाण म्हणून भारत नवव्या स्थानावरून पाचव्या स्थानावर आला आहे. गुंतवणुकीचा प्रवास भांडवल उभारणीपासून जरी सुरू झाला तरी जागतिक घडामोडी, राजकीय स्थैर्य आणि सामाजिक बदल, जनतेने बचत आणि गुंतवणुकीस दिलेला प्रतिसाद, रोजगारक्षम लोकसंख्या अशा विविध घटकांचा गुंतवणूक दरावर परिणाम होत असतो. भारताकडे सकारात्मक दृष्टीने पाहिले जात आहे, याची कारणे काय असतील, याचा शोध घेतला तर काय दिसते? आपले शाश्वत विकासाचे उद्दिष्ट सन २०३० पर्यंत पूर्ण करण्याचे लक्ष्य असल्याने सामाजिक, आर्थिक, पर्यावरण, कृषी, तंत्रज्ञान आणि व्यापार या घटकातील गुंतवणूक महत्त्वाची आहे. शैक्षणिक क्षेत्रात नीती आयोगाने मुंबईत 'एज्युसिटी' संकल्पना विकसित करताना शंभर हेक्टर क्षेत्रात निरनिराळी महाविद्यालये, विद्यापीठांनी युक्त अशा शैक्षणिक केंद्रात नवी मुंबई एअरपोर्ट, नील आणि हरित संसाधने, कमी किमतीत घरे, करमणुकीची साधने यांची गुंतवणूक केली आहे.

आरोग्य विमा, टेली मेडिसिन, गृह आरोग्य सेवा, वैद्यकीय पर्यटन आणि आर्थिकदृष्ट्या कमकुवत असलेल्या वर्गासाठी आयुष्मान भारत योजना इत्यादींचा सामाजिक गुंतवणुकीत वाढता सहभाग दिसून येतो. सन २०१८ पासून एकूण भांडवलापैकी कृषी व शिक्षण क्षेत्रातील गुंतवणूक ६७ टक्क्यांपर्यंत पोहोचली असून, त्या खालोखाल ऊर्जा, सूक्ष्म वित्त कंपन्या, डेट आणि इक्विटी यांच्याकडून गुंतवणुकीचे कार्य होत आहे. आज एक्युमेन,



युनिट्स व्हेंचर, आविष्कार ग्रुप हे गुंतवणुकीचे नेतृत्व करताना दिसतात. तसेच, डिजिटल पर्सनल डेटा प्रोटेक्शन ॲक्ट २०२३ लागू केल्यामुळे गुंतवणुकीत उत्साहाचे वातावरण आहे. शाश्वत विकासासाठी राजकीय धोरणात सुरक्षा, सायबर सुरक्षा, तडजोड, न्याय, विधी, नैतिकता आणि भांडवल गुंतवणूक यांचा समावेश आहे. सन २०१८ मध्ये भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियमात भ्रष्टाचाराची पाळेमुळे शोधण्यासाठी विशेष न्यायाधीशांची नेमणूक, क्रिमिनल प्रोसिजर ऑफ कोड ऑफ इंडियातर्फे सीबीआयकडून चौकशी व उलट तपासणी इत्यादी विशेष अधिकार दिल्याने या कायद्यात बदल होऊन गुंतवणुकीची सुरक्षिततेकडे वाटचाल होत आहे. उदारीकरणाबरोबर युती सरकारने चीनला आव्हान देण्यासाठी अनेक पायाभूत सुविधा निर्माण करून सेमीकंडक्टर, मोबाइल फोन, लॅपटॉप यात स्वयंपूर्णता आणण्यास प्राधान्य दिले आहे. सन २०२० मध्ये पीएलआय म्हणजेच प्रॉडक्शन लिंक्ड इन्सेंटिव्ह ही योजना आली असून त्यासाठी ऑटोमोबाईल्स, लॅपटॉप, दूरसंचार, टेक्स्टाईल, आयटी, हार्डवेअर आणि आरामदायी वस्तू अशी १३ उत्पादन क्षेत्रे निवडली आहेत. यासाठी मोठी आर्थिक तरतूद केल्यामुळे राज्यांतील स्थानिक कारागिरांना राष्ट्रीय मंचावर येण्याची संधी मिळाली आहे.

या धोरणाचा एक भाग म्हणजे महाराष्ट्रातील तळेगाव दाभाडे येथील ७० एकर क्षेत्रावरील साऊथ कोरियन ह्युंदाई स्टील प्रकल्प, प्युअर ऑल लॉजिस्टिक्स, मूव्हमेंट सिस्टिम या प्रकल्पांमुळे मंगळूर, नवलखाउंबरे, बादलवाडी, करंजविहीरे या आसपासच्या गावांमध्ये २६४० नवीन रोजगार निर्मिती होऊ घातली आहे. तसेच, १.२ ट्रिलियन मूल्य असलेले स्कोडा, फॉक्सवॅगनचे चाकण येथील तर

टोयोटा किर्लोस्कर मोटर्स हे संभाजीनगर येथील प्रकल्प हायब्रीड व इलेक्ट्रिक वाहनांचे असून ज्यामुळे राज्यात १४ हजार आठशे नवे रोजगार निर्माण होतील. अदानींचा पनवेल, रायगड येथील सेमीकंडक्टर चिप निर्मिती प्रकल्प इस्त्रायलच्या साह्याने होत असून रोजगार निर्मितीच्या यादीत तेही समाविष्ट आहेत.

अल्प आणि दीर्घ मुदतीच्या भांडवली गरजांसाठी भारतात सुमारे १२ हजार फिनटेक कंपन्या कार्यरत असून ८७ टक्के दराने विकसित होत आहेत. त्या गुंतवणूक, कर्ज, इक्विटी, विमा, वेल्थ टेक आणि निओ बँकिंग सेवा देऊन वित्तीय क्षेत्राला आत्मनिर्भर करीत आहेत. स्टार्टअप कंपन्यांचे कामकाज हे त्यांच्या रजिस्ट्रेशनपासून त्यांच्यासाठी पीअर टू पिअर लेंडिंग, रोबो सल्ला, अल्गोरिदम आणि क्रेडिट मूल्यांकनापर्यंत सेवा देऊन सुलभ झाले आहे. जागतिक पातळीवर फिनटेक उद्योग २०२५ मध्ये १५० अब्ज डॉलरपर्यंत जाईल. त्यातील १४ टक्के वाटा भारतीय स्टार्टअप फिनटेक कंपन्यांचा असेल. तसेच, ४५ लाख रोजगार संधी विमा इकोसिस्टीम कंपन्यांनी दिल्या आहेत. इन्सरटेकमधील ६६ विमा कंपन्यांकडून 'सर्वांसाठी विमा' ही योजना राबविली जात असून सरकारी, खासगी विमा कंपन्यांबरोबर इन्शुरन्स देखो, टर्टलमिंट, झापर, पॅस केअर ग्रुप, वी राईज यांनी विविध सेवा दिल्या आहेत.

संरक्षण क्षेत्रात स्वदेशीकरणाला चालना देण्यासाठी सृजन पोर्टल कार्यरत असून त्यावर ३६ हजार ४६६ संरक्षण वस्तू अपलोड झाल्या आहेत. येथील ५१ लाख रोजगार निर्मितीमध्ये लाईट व मध्यम कॉम्बॅट, अर्जुन रणगाडे हे 'मेक इन इंडिया'तून उत्पादित होत आहेत. उत्तर प्रदेश आणि तमिळनाडू कॉरिडॉरमध्ये संरक्षण क्षेत्रातील १९४ स्टार्टअप सुरू झाले आहेत. सन २०२३ मध्ये ११८ स्टार्टअप भारतात सुरू झाले असून २७ स्टार्टअप पुण्यात आहेत. यातून साखळी पद्धतीने एक लाख विविध उद्योग सुरू झाले आहेत.

नवकल्पना देश क्रमवारीत १३२ देशांमध्ये भारताचा चाळीसावा क्रमांक आहे. मुंबई, दिल्ली, हैदराबाद, पुणे, गोवा येथील 'अटल इन्क्युबेशन केंद्रा'त २५ हजार तज्ज्ञ कार्यरत असून या सेंटरतर्फे उद्योजकांसाठी कामाची जागा, सीड फंड, मार्गदर्शन, गुणवत्ता चाचणी अशा उपयुक्त सेवा दिल्या जातात. प्रवासी कौशल्य विकास योजनेत तरुणांना आंतरराष्ट्रीय बाजारपेठेत रोजगार सक्षम



बनण्यासाठी विशेष कौशल्य आवश्यक आहे. त्यासाठी फ्रान्स, जर्मनी, ऑस्ट्रेलिया, इंग्लंड, नेदरलँड यांच्याशी आंतरराष्ट्रीय भाषा, संगणक कोर्सेस, संवाद कौशल्य या क्षेत्रांमध्ये करार केले आहेत. मैत्री, म्हणजे महाराष्ट्र इंडस्ट्री ट्रेड अँड इन्व्हेस्टमेंट फॅसिलिटी या एजन्सीने २००५ पासून आपल्या उत्पादन संस्थेच्या स्थापनेसाठी सिंगल विंडो स्कीम, इकोसिस्टम, तक्रार निवारण यंत्रणा, एक जिल्हा एक उत्पन्न योजनेचे फायद्यांची ओळख अशा अनेक योजना राबवल्या आहेत. एक जिल्हा एक उत्पन्न या योजनेत २०१८ मध्ये एक हजार १०२ उत्पादने आली आहेत. आपल्या जिल्ह्याचे निवडलेले उत्पादन तेथील व्यक्ती सहज स्वीकारते, असा अनुभव आहे.

उत्पादन म्हटले की नवकल्पना, शोध आणि संशोधन आले. नॅसकॉमने सादर केलेल्या एका अहवालानुसार भारतात सध्या एक हजार ५८० जागतिक क्षमता केंद्रे म्हणजे जीसीसी कार्यरत असून अशी केंद्रे भारतातील व्यवसायवाढीसाठी प्रगत तंत्रज्ञान विकसित करून सेवांमध्ये सातत्य ठेवत आहेत. भारतातील एजीसी नेटवर्क, विप्रो, टीसीएस, आयबीएम, सौदी टेलिफोन कंपनी या सेवांसाठी अग्रेसर आहेत. गुंतवणुकीत केवळ कुशल आणि संघटित कामगारांना सरकारने प्राधान्य दिले असे नाही तर असंघटित क्षेत्रातील कामगारांना एकत्र आणून रोजगारक्षम बनवण्यासाठी ई-चौपाल पोर्टलवर त्यांची नोंदणीची पद्धती उपलब्ध केली आहे. तसेच, बालमजूर, वेठबिगार यांच्यासाठी श्रम, रोजगार खाते आणि 'नॅशनल बोर्ड फॉर वर्कर्स एज्युकेशन अँड डेव्हलपमेंट' यांच्यातर्फे बाल कामगारांचे पुनर्वसन आणि त्यांच्या सर्वेक्षणासाठी प्रति जिल्हा साडेचार लाख रुपये दिले आहेत. या सर्व घटकांमुळे जागतिक मंदी असूनही भारताकडे आशादायी दृष्टीने पाहिले जात आहे.

**(सौजन्य: दै. महाराष्ट्र टाईम्स)**

# नागपूरसह विदर्भाच्या विकासाला चालना

● मिलिंद कानडे

सहा वर्षांपूर्वी ऑक्सफोर्ड इकॉनॉमिक्सने २०३५ पर्यंत जगभरात वेगाने वाढणाऱ्या शहरांचा अभ्यास केला होता. त्यात सूरतने पहिला तर नागपूरने पाचवा क्रमांक पटकावला. त्याशिवाय आग्रा, बंगळुरू, हैदराबाद, तिरुपूर, राजकोट, तिरुचेलापल्ली, चेन्नई आणि विजयवाडा ही शहरेसुद्धा टॉप टेनमध्ये आहेत. भारताच्या केंद्रस्थानी असलेले नागपूर शहर अगदी सुरुवातीपासूनच देशाच्या दृष्टीने महत्त्वाचे राहिलेले आहे. अशात येथील डॉ. बाबासाहेब आंबेडकर आंतरराष्ट्रीय नागपूर विमातनळाचे अद्ययावतीकरण आणि विस्तारीकरण या शहरालाच नव्हे संपूर्ण विदर्भाला वेगळी ओळख देणार आहेत. या होऊ घातलेल्या परिवर्तनावर प्रकाश टाकणारा हा लेख.

**गेल्या** काही वर्षांपर्यंत अक्षरश: विनोदाचा वा चेष्टेचा विषय बनलेल्या डॉ. बाबासाहेब आंबेडकर आंतरराष्ट्रीय नागपूर विमातनळाच्या विस्ताराचा अखेर ९ ऑक्टोबर २०२४ रोजी शुभारंभ झाला. हा दिवस नागपूर आणि विदर्भाच्या इतिहासातील एक सुवर्ण दिवस ठरला. या दिवशी देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते व्हर्च्युअल पद्धतीने नागपूर विमानतळाच्या विस्तारकार्याचा भूमिपूजन थाटात पार पाडले. विमानतळाचा विस्तार होणे शक्यच नाही,




असा सूर आवळला जात असताना केंद्रातील मोदी सरकार आणि राज्यातील महायुतीच्या सरकारमुळे असंभवदेखील संभव होत असल्याचे चित्र स्पष्ट झाले आहे. मागील काही वर्षांमध्ये विमानतळाच्या विस्ताराचा मुद्दा पूर्णत: मागे पडला होता. त्यामुळे नागपूर आणि पर्यायाने विदर्भाचे प्रचंड नुकसान झाले. नवीन धावपट्टी, सुसज्ज आणि वाढती प्रवासीसंख्या हाताळू शकेल अशी आधुनिक टर्मिनल इमारत आदींचा विकास झाल्यास विदर्भासाठी प्रगतीची दारे उघडणार आहेत, असे म्हटल्यास अतिशयोक्ती होणार नाही. या संपूर्ण पार्श्वभूमीवर नागपूर विमानतळाच्या विकासकार्याच्या दृष्टीने पडलेले पाऊल खऱ्या अर्थाने समृद्धीची नांदी ठरणार आहे.

### विकासाचे द्योतक

विमानतळाच्या विस्तारकार्याच्या निमित्ताने उशिरा का होईना विदर्भाच्या विकासाकडे लक्ष देण्यात आले आहे. अन्यथा महाराष्ट्राच्या निर्मितीपासूनच्या सहा दशकांत राज्याचा हा भाग शेती, सिंचन, उद्योग, रोजगार अशा सर्वच क्षेत्रात मागासलेला आहे. विकासाची गंगा फक्त पुणे, बारामती आणि पश्चिम महाराष्ट्रात वाहायची. विदर्भातील वीजेवर पश्चिम महाराष्ट्रातील शहरे चकाकत होती, उद्योगधंदे चालू होते. कोळसा आणि कापूसही विदर्भातून पुरवठा केला जात होता. विदर्भाला विकासाचे माप देण्याचे आश्वासन देणाऱ्या नागपूर कराराकडे पूर्णपणे दुर्लक्ष

करण्यात आले. हा इतिहास आहे. पण, देवेंद्र फडणवीस मुख्यमंत्री झाल्यानंतर त्यांच्या इच्छाशक्तीमुळे नागपूरजवळील मिहानमध्ये सेझ अंतर्गत पायाभूत सुविधा निर्माण झाल्या, बोईंगच्या एमआरओसह अनेक उद्योगांनी नागपुरात येण्यास स्वारस्य दाखवले. त्यांच्या प्रयत्नाने नागपुरात मेट्रो सुरू झाली. मिहानचा पूर्ण क्षमतेने विकास होण्यासाठी विमानतळाला विस्तारित धावपट्टीची आवश्यकता आहे. सध्याची धावपट्टी ४५ मीटर रुंद आणि ३ हजार ६०० मीटर लांब आहे. सध्या येथे एकावेळी १७ विमाने उतरू शकतात. विकासाच्या गरजा लक्षात घेऊन या धावपट्टीच्या शेजारी आणखी ६० मीटर रुंद आणि ४ हजार मीटर लांबीची धावपट्टी बांधण्यात येणार आहे. तिथे एकाच वेळी १०० विमाने उभी राहू शकतील. मोठ्या औद्योगिक टाऊनशिपला लागून असलेले कार्गो हब आणि मोठे विमानतळ अशी ही रचना भविष्यातील विकासाच्या द्योतक ठरणार आहे.

### समृद्ध महाराष्ट्राचा पाया

विमानतळ उभारणीचा दीर्घ अनुभव असलेल्या जीएम आर कंपनीकडे नागपूर विमानतळाच्या विस्ताराचे काम सोपवण्यात आले आहे. फडणवीस यांनी आमदार असताना या प्रकल्पाचे स्वप्न पाहिले आणि मुख्यमंत्री असताना प्रयत्न सुरू ठेवले. आता त्यांचे स्वप्न पूर्ण होणार आहे. नवीन विमानतळ ३,००,००० स्क्वेअर फूट क्षेत्रात बांधले जाणार आहे. २०२४ मध्ये वर्षाकाठी १.४० कोटी प्रवासी याचा वापर करतील. याशिवाय ९ लाख टन मालवाहतूक हवाई मार्गाने होणार आहे. त्यामुळे शेतीमाल, कपडे, औषधे व इतर वस्तूंच्या निर्यातीला चालना मिळणार असून सुमारे १ लाख लोकांना रोजगार उपलब्ध होणार आहे. समृद्धी महामार्ग, माझी मेट्रो आणि विस्तारित विमानतळ ही विकासाची त्रिसूर्ती ठरणार आहे. गेल्या दहा वर्षांत केंद्रातील सरकारने देशाच्या विकासासाठी आधुनिक पायाभूत सुविधा निर्माण करण्याचा महायज्ञ सुरू केला आहे. केवळ इमारती बांधण्याऐवजी समृद्ध महाराष्ट्राचा पाया रचण्याचे कार्य सुरू आहे. त्यात विमानतळाचा विस्तार एक मैलाचा दगड ठरणार आहे. रस्ते, रेल्वे, विमानतळ विकास यामार्फत विदर्भ लॉजिस्टिक हब म्हणून विकसित होणार आहे. यासोबतच वैनगंगा-नळगंगा नदी जोड प्रकल्पातून शाश्वत सिंचनाचा पर्याय पुढील काही वर्षात उपलब्ध झाल्यास विदर्भाच्या सर्वांगिण विकासाचा 'टेक ऑफ' होणार आहे.

### कृषी क्षेत्राला संजीवनी

नागपूर विमानतळाचा विस्तार आणि अद्ययावतीकरणामुळे विदर्भातील कृषी क्षेत्राला संजीवनी मिळणार आहे. विदर्भात कापूस, संत्री, झिंगे, मासे यांचे उत्पादन चांगले आहे. या सर्व उत्पादनाची निर्यात होण्यास गती मिळणार आहे. विमानतळाच्या विस्तारामुळे येथून होणाऱ्या मालवाहतुकीची क्षमता वाढणार आहे. जीएमआर कंपनीने तसा मानस व्यक्त केला आहे. परिणामत: पश्चिम महाराष्ट्राच्या तुलनेत काहीसी मागे राहिलेले विदर्भातील कृषी क्षेत्र आता नव्या उमेदीने फुलणार आहे. देशाने ५ ट्रिलीयन डॉलर अर्थव्यवस्थेचे उद्दिष्ट ठेवले आहे. यासाठी महाराष्ट्राने पुढाकार घेतला असून विस्तारित आणि अद्ययावत विमानतळाचे योगदान मोलाचे ठरणार आहे. अनेक आंतरराष्ट्रीय विमानांसाठी आगमन-गंतव्य स्थान म्हणून कार्य करण्यासोबतच विस्तारित विमानतळाच्या माध्यमातून ९,००,००० टन क्षमतेच्या कार्गोची हाताळणी होणार आहे. नागपूर विमानतळ लवकरच मध्य भारतातील सर्वांसाठी गेम चेंजर म्हणून सिध्द होणार आहे.

### अनुशेष भरून काढणारे ग्रोथ इंजिन

गेल्या दशकभरात नागपूरचा लक्षणीय विकास झाला आहे. संत्र्यांची राजधानी म्हणून सुप्रसिध्द असलेले हे शहर आता वाघांसाठी देखील प्रसिध्द झाले असून अनेक सुप्रसिध्द व्यक्तींसह देशभरातून अनेकानेक पर्यटक येथे येऊ लागले आहेत. नुकतेच येथे झालेले उल्लेखनीय असे चारस्तरीय पुलांचे उद्घाटन येथील पायाभूत सुविधा क्षेत्रातील अनोखी कामगिरी ठरली आहे. अखंड पाणीपुरवठ्यासारख्या मुलभूत सुविधांसह या शहरात एम्स, आयआयएम तसेच सिंबायोसिससारख्या प्रमुख शैक्षणिक संस्था कार्यरत आहेत. नजीकच्या काळात झालेल्या मिहानच्या विस्तारामुळे लक्षणीय प्रमाणातील रोजगार निर्मिती देखील झाली आहे. अशात विमानतळाच्या विस्तारामुळे पर्यटकसंख्या वाढणार आहे. विमानांची संख्येत वृद्धी होणार आहे. यातून मोठ्या प्रमाणात रोजगार निर्मिती होणार असून विदर्भाचा आर्थिक अनुशेष भरून काढणारे हे एक ग्रोथ इंजिन ठरणार आहे. ■

# विकसित भारताच्या दिशेने आगेकूच

> मुद्रा कर्ज, स्वरोजगार क्षेत्रामध्ये एक नवीन क्रांती घेवून आले आहे. याला मिळालेले यश पाहता, प्रारंभी जे १० लाख रूपये कर्ज मिळत होते, त्यामध्ये बाढ करून आता २० लाख रूपये करण्यात आले आहे. देशामध्ये ३ कोटी लखपती दीदी बनविण्याचा निर्धारही पूर्ण होत आहे. गेल्या वर्षांमध्ये १ कोटी लखपती दीदी बनल्या आहेत. आता पहिल्या १०० दिवसांमध्ये संपूर्ण देशात ११ लाख नवीन लखपतीदीदी बनल्या आहेत.



**अलिकडेच** सरकारने तेलबियांची लागवड करणाऱ्या शेतकरी बांधवांच्या हितासाठीही एक मोठा निर्णय घेतला आहे. हा निर्णय यासाठी घेतला आहे की, देशामध्ये तेलबिया उत्पादित करणाऱ्या शेतकरी बांधवांना वाढविण्यात आलेले एमएसपी– किमान समर्थन मूल्य मिळावे. तसेच यासाठी परदेशातून तेल आयात करण्यावर शुल्क वाढविण्यात आले आहे. त्यामुळे सोयाबीन आणि सूर्यफूल यासारखी पिके घेणाऱ्या शेतकरी बांधवांना चांगला लाभ होईल. यामुळे देशाला खाद्यतेलामध्ये आत्मनिर्भर बनविण्याच्या मिशनलाही वेग येईल. केंद्र सरकारने बासमती तांदूळ आणि कांदा निर्यातीवर लावलेले नियंत्रण काढून टाकले आहे. यामुळे परदेशातून भारतीय तांदूळ आणि कांद्याला होणारी मागणी वाढली आहे. या निर्णयाचा देशातील कोट्यवधी शेतकरी बांधवांना फायदा होत आहे. खरीप हंगामातील पिकांवर किमान समर्थन मूल्य (एमएसपी) वाढविण्यात आले आहे. यामुळे देशातील कोट्यवधी शेतकऱ्यांना जवळपास २ लाख कोटी रूपयांचा फायदा होईल. गेल्या १०० दिवसांमध्ये सर्वांच्या हितासाठी असे अनेक निर्णय घेण्यात आले आहेत.

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी प्रारंभीच सांगितले होते की तिसऱ्या कार्यकाळामध्ये पहिल्या १०० दिवासांमध्ये देशासाठी अभूतपूर्व निर्णय घेतले जातील. गेले १०० दिवसात मी दिवस किंबा रात्र पाहिले नाही. १०० दिवसांचा निश्चित केलेला कार्यक्रम पूर्ण करण्यासाठी आपली संपूर्ण शक्ती पणाला लावली... देश असो अथवा परदेश, जिथे असेल तिथे जे काही प्रयत्न करणे शक्य आहे, ते ते सर्व केले. यामध्ये कोणतीही कसर बाकी ठेवली नाही.

### पायाभूत सुविधांमुळे आकांक्षांना नवीन पंख

गेल्या १०० दिवसांमध्ये रेल, बंदर, विमानतळे आणि मेट्रो यांच्याशी संबंधित डझनभर प्रकल्पांना स्वीकृती देण्यात आली आहे. या काळामध्ये देशभरातील अनेक शहरांमध्ये मेट्रोच्या विस्ताराशी संबंधित निर्णय घेण्यात आले आहेत. वंदे भारत रेल्वेचे नेटवर्क या १०० दिवसांमध्ये वेगाने विस्तारले आहे. ही गोष्ट अभूतपूर्व म्हणावी लागेल. या काळामध्ये देशामध्ये १५ पेक्षा जास्त रेलमार्गांवर नवीन वंदे–भारत गाड्या सुरू झाल्या आहेत. याचा अर्थ असा झाला की, १५ आठवड्यात म्हणजे प्रत्येक सप्ताहात एक या हिशोबाने १५ नवीन मेट्रो. वाराणसी आणि नवी दिल्लीच्या मधात चालणारी वंदे भारत

२० कोचची झाली आहे. आज देशात सव्बाशेपेक्षा जास्त वंदे भारत रेल्वे प्रत्येक दिवशी हजारो लोकांना उत्तम प्रवासाचा आनंद देत आहेत. या १०० दिवसांमध्येच ३० हजार करोडच्या गुंतवणूकीच्या माध्यमातून १२ नवीन औद्योगिक वसाहती निर्माण कार्याला मंजुरी देण्यात आली आहे. ५०,००० कोटी रूपयांपेक्षाही अधिक खर्चाचे आठ 'हाय-स्पीड कॉरिडॉर'ला स्वीकृती देण्यात आली आहे. तसेच ३० हजार कोटी रूपये खर्चून पुणे, ठाणे आणि बंगलुरू मेट्रोचा विस्तार करण्याच्या कामाला मंजुरी देण्यात आली आहे. याचकाळामध्ये लडाख येथेजगातील सर्वात उंचीवरील बोगदा निर्माणाचे काम सुरू करण्यात आले आहे. स्वातंत्र्यानंतर सात दशकापर्यंत भारतामध्ये एमबीबीएस- एमडी यांच्या जागा आधी ८० हजारांच्या जवळपास होत्या. जागा कमी असल्यामुळे आधी डॉक्टर बनण्यासाठी आपल्या इथल्या मुलांना नाइलाजाने परदेशामध्ये जावे लागत होते. गेल्या १० वर्षांमध्ये देशातच आपण एमबीबीएस-एमडीच्या एक लाख नवीन जागा आणखी वाढवल्या आहेत. त्यामुळे आज देशात एमबीबीएस-एमडीच्या जवळपास एक लाख ८० हजारपेक्षा जास्त जागा निर्माण झाल्या आहेत. तसेच १५ ऑगस्ट रोजी लाल किल्ल्याच्या बुरूजावरून केलेल्या भाषणात पंतप्रधानांनी जाहीर केले आहे की, आगामी ५ वर्षांमध्ये भारतात वैद्यकीय क्षेत्रामध्ये आणखी ७५ हजार नवीन जागा उपलब्ध करून दिल्या जातील. त्यामुळे भारत अवघ्या जगामध्ये आरोग्य- निरामयतेचे खूप महत्वपूर्ण केंद्र बनेल, असा दिवस आता फार दूर असणार नाही. गेल्या काही वर्षांमध्ये तंत्रज्ञानाच्या क्षेत्रामध्ये भारताच्या प्रगतीला वेग आला आहे. आता तंत्रज्ञानाबरोबरच पर्यटनही भारताच्या प्रगतीचा एक महत्वपूर्ण स्तंभ बनेल. जगभरातील पर्यटकांसाठी, प्रत्येक क्षेत्रातील पर्यटकांसाठी भारत सर्वाधिक आकर्षणाचे केंद्र बनावे, असा प्रयत्न आज देश करीत आहे.आज भारतामध्ये ऐतिहासिक आणि सांस्कृतिक केंद्रांना भव्य आणि दिव्य बनवले जात आहे. भारताचे सागरी किनारे, आणि व्दीप विकसित केले जात आहेत.

### सामाजिक - आर्थिक प्रगतीचा नवीन टापा

या १०० दिवसांमध्ये भौतिक पायाभूत सुविधा निर्माण करण्यासाठी काम झाले तसेच सामाजिक पायाभूत सुविधांचा विस्तार केला जात आहे. भारतामध्ये हा पंधरवडा सण-उत्सवांचा असतो. मात्र १० वर्षांचे विश्लेषण करायचे झाले, तर असे स्पष्ट दिसून येते की, देश विकासाचा उत्सव साजरा करीत आहे. आणि हे दशक, विकासाचे दशक बनले आहे. गेल्या १० वर्षांमध्ये फिनटेक स्पेस मध्ये ३१ अब्ज डॉलरपेक्षा जास्त गुंतवणूक झाली आहे. १० वर्षांमध्ये फिनटेक स्टार्टअपमध्ये ५०० टक्क्यांची वृद्धी झाली आहे. स्वस्त मोबाइल फोन, स्वस्त डेटा आणि शुन्य शिल्लक जनधन बॅंक खाते, या तीन गोष्टींनी भारतामध्ये कमाल केली आहे. एका दशकामध्येच भारतामध्ये ब्रॉडबॅंड वापरकर्त्यांमध्ये ७ कोटींची वाढ होवून ही संख्या जवळपास ९४ कोटी झाली आहे. आज १८ वर्षांवरील फारच क्वचित, म्हणजे एखाद्याच भारतीयाकडे त्याचे डिजिटल ओळखपत्र-आधारकार्ड नसेल. आज ५३ कोटींपेक्षाही अधिक लोकांकडे जनधन बॅंक खाते आहे. याचा अर्थ १० वर्षांमध्ये एकप्रकारे संपूर्ण युरोपियन संघाइतक्या लोकसंख्येला भारतामध्ये बॅंकिंग कार्यप्रणालीशी जोडले आहे. जनधन-आधार-मोबाइल त्रिवेणीने आणखी एका परिवर्तनाला गती दिली आहे. आज जगातील एकूण व्यवहारापैकी जवळ-जवळ अर्धे 'रिअल-टाइम' डिजिटल व्यवहार भारतामध्ये होत आहेत. संपूर्ण दुनियेमध्ये भारताचे यूपीआय फिनटेक हे खूप मोठे उदाहरण बनले आहे. आज खेडेगाव असो अथवा शहर, हिवाळा असो अथवा उन्हाळा, पर्जन्यवृष्टी होत असो अथवा हिमवर्षाव होत असो. भारतामध्ये बॅंकिंग सेवा २४ तास, सातही दिवस, बारा महिने सुरू असते. कोविडसारख्या वैश्विक महामारीच्या इतक्या मोठ्या संकटाच्या काळातही भारत जगातील अशा देशांमध्ये सहभागी होता, जिथे बॅंकिंग सेवा कोणत्याही प्रकारच्या व्यत्ययाविना सुरू होती. याचा अर्थ प्रतिष्ठेचे जीवन जगण्यासाठी मिळावे, जीवनाची गुणवत्ता अधिक चांगली बनविण्यामध्ये भारतातील फिनटेक क्रांती महत्वपूर्ण भूमिका निभावत आहे. आदिवासी मंत्रालयाच्या अंदाजपत्रकामध्ये दुप्पट वाढ करण्यात आली आहे. देशभरामध्ये जवळपास ६० हजार आदिवासी गावांच्या विकासासाठी विशेष योजना राबविण्यात येणार असल्याची घोषणा करण्यात आली आहे. गेल्या १०० दिवसांमध्येच सरकारी कर्मचारी वर्गासाठी एका चांगल्या निवृत्तीवेतन योजनेची घोषणा करण्यात आली आहे. जे कर्मचारी आहेत, जे दुकानदार आहेत, मध्यम वर्गातील उद्योजक आहेत, त्यांचा प्राप्तीकर आता कमी केला आहे. **(पूर्वार्ध)**

# मोदी सरकार आणि महायुती सरकारने वाल्मिकी, मेहतर समाज सफाई कर्मचा-यांसाठी घेतलेले निर्णय



**१)** काँग्रेस सत्तेत असताना २००६ मध्ये राज्य सफाई कर्मचारी आयोग बंद पडला होता. देवेंद्र फडणवीसजी मुख्यमंत्री झाल्यावर त्यांच्या सरकारने हा आयोग पुन्हा स्थापन झाला.

**२)** देवेंद्रजी मुख्यमंत्री असताना डॉ.आंबेडकर श्रमसाफल्य आवास योजनेंतर्गत कार्यरत सफाई कर्मचाऱ्यांना ५० टक्के सदनिका व ५० टक्के सदनिका सेवा निवृत्त कर्मचाऱ्यांना देण्याचा निर्णय घेण्यात आला.

**३)** डॉ.आंबेडकर श्रमसाफल्य योजनेंतर्गत मृत्यू झालेल्या कामगाराच्या पात्र वारसाला सदनिका देण्याचा निर्णय फडणवीस सरकारने घेतला.

**४)** सफाई कामगारांना महापालिका, नगरपालिका कर्मचाऱ्यांप्रमाणे शासकीय सुट्ट्या देण्याचा निर्णयही फडणवीस सरकारने घेतला.

**५)** शासकीय सुट्ट्यांच्या दिवशी काम करावे लागल्यास सफाई कामगारांना महापालिका आणि नगरपालिकांनी त्याचा मोबदला द्यावा, असा आदेशही फडणवीस सरकारने काढला.

**६)** लाड–पागे समितीच्या शिफारसीनुसार वाल्मिकी समाजाच्या कामगारांच्या वारसांना शैक्षणिक पात्रतेनुसार उच्च पदावर नियुक्ती देण्याचा निर्णयही देवेंद्र फडणवीस यांनी मुख्यमंत्री असताना घेतला.

**७)** फडणवीस सरकारच्या या निर्णयामुळे मेहतर वाल्मिकी समाजातील कर्मचाऱ्यांच्या उच्च शिक्षित वारसांना समाजसेवक अधिक्षक, स्थापत्य अभियांत्रिकी सहायक श्रेणी आरोग्य सेवक, कालवा निरीक्षख, कनिष्ठ लिपिक, प्रयोगशाळा सहायक, टेलिफोन ऑपरेटर अशा विविध तांत्रिक व अतांत्रिक पदांवर नियुक्त्या मिळत आहेत.

**८)** डोक्यावरून मैला वाहणाऱ्या सफाई कामगारांच्या वारसांना प्राधान्याने नोकऱ्या देण्याचा निर्णय महायुती सरकारने फेब्रुवारी २०२३ मध्ये घेतला.

**९)** महायुती सरकारच्या निर्णयामुळे १९७५ पासून ज्या सफाई कामगारांच्या वारसांनी विहित मुदतीत अर्ज सादर केले नसतील त्यांनाही नव्याने अर्ज करून नातू, नात या पुढील पिढीला वारसा हक्काने नियुक्ती मिळू लागली आहे.

**१०)** १ नोव्हेंबर २००५ पासून सेवेत असणाऱ्या मयत किंवा वैद्यकीयदृष्ट्या पात्र कर्मचाऱ्यांना जुनी पेन्शन योजना व सेवा उपदान लागू करण्याचा निर्णय महायुती सरकारने मार्च २०२३ मध्ये घेतला.

**११)** सेवानिवृत्त सफाई कर्मचाऱ्यांना व कुटुंब निवृत्ती वेतनधारकांना वय वर्ष ८० ते १०० पर्यंत मूळ निवृत्ती वेतनात २० ते १०० टक्के वाढ करण्याचा निर्णय महायुती सरकारने १६ जानेवारी, २०२४ रोजी घेतला.

**१२)** देवेंद्र फडणवीस मुख्यमंत्री असताना महिला कर्मचाऱ्यांना १८० दिवसांची बालसंगोपन रजा देण्याचा निर्णय घेण्यात आला.

**१३)** कोणतेही उपकरण व साधनाने महिला सफाईचे काम करणाऱ्या कामगाराचा दूषित गटारामध्ये मृत्यू झाल्यास त्याच्या वारसांना १० लाख रुपये नुकसान भरपाई देण्याचा निर्णय घेण्यात आला.

**१४)** अविवाहित मुलीस तहहयात पेन्शन देण्याचा निर्णय घेण्यात आला.

**१५)** अविवाहीत कर्मचाऱ्याचा मृत्यू झाल्यास त्यांच्यावर अवलंबून असणाऱ्या आई–वडिलांना कुटुंब निवृत्ती वेतन देण्याचा निर्णय घेण्यात आला.

**१६)** राष्ट्रीय सफाई कर्मचारी वित्त विकास महामंडळामार्फत सफाई कर्मचाऱ्यांच्या कुटुंबांना शैक्षणिक कर्ज, महिला समृद्धी योजना अशा वेगवेगळ्या योजनांच्या माध्यमातून १ लाख ते ५० लाखापर्यंतचे कर्ज अल्प व्याजदरात कर्ज देण्याची सुविधा मोदी सरकारने सुरू केली आहे.

**संकलन –डॉ. रेखा गोपालसिंग बहनवाल,**
**राष्ट्रीय महासचिव**
**अखिल भारतीय वाल्मिकी महासभा (रजि.)**

# पीएम-विद्यालक्ष्मी योजनेला मंजुरी

## प्रतिभावान विद्यार्थ्यांना दर्जेदार उच्च शिक्षण घेण्यासाठी अर्थसहाय्य केले जाणार

**४.५** लाख रुपयांपर्यंत कौटुंबिक वार्षिक उत्पन्न असलेल्या विद्यार्थ्यांना देण्यात आलेल्या संपूर्ण व्याज सवलतीव्यतिरिक्त ही योजना लागू. प्रतिभावान विद्यार्थ्यांना दर्जेदार उच्च शिक्षण मिळवण्यात आर्थिक अडचणी येऊ नयेत म्हणून आर्थिक पाठबळ देण्यासाठी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या बैठकीत केंद्रीय मंत्रिमंडळाने पीएम–विद्यालक्ष्मी योजनेला मंजुरी दिली आहे. पीएम विद्यालक्ष्मी हा राष्ट्रीय शिक्षण धोरण, २०२० चा आणखी एक महत्त्वाचा उपक्रम आहे, ज्या धोरणात प्रतिभावान विद्यार्थ्यांना सार्वजनिक आणि खाजगी अशा दोन्ही उच्च शिक्षण संस्थांमध्ये शिक्षण घेण्यासाठी विविध उपायांच्या माध्यमातून अर्थसहाय्य उपलब्ध करून दिले जावे, अशी शिफारस करण्यात आली होती. ज्या विद्यार्थ्याला दर्जेदार उच्च शिक्षण संस्थांमध्ये प्रवेश मिळेल तो विद्यार्थी, त्याच्या अभ्यासक्रमाचे शुल्क आणि या अभ्यासक्रमाशी संबंधित इतर खर्चाची गरज भागवण्यासाठी पीएम विद्यालक्ष्मी योजने अंतर्गत कोणतीही बँक किंवा वित्तीय संस्थांमधून तारण विरहित, हमीदार विरहित कर्ज मिळवण्यासाठी पात्र असेल. एका साध्या, पारदर्शक, विद्यार्थी स्नेही प्रणालीच्या माध्यमातून राबवली जाणारी ही योजना आंतर–परिचालनक्षम आणि संपूर्णपणे डिजिटल असेल.

७.५ लाख रुपयांपर्यंतच्या कर्जासाठी, विद्यार्थी त्याच्या थकबाकीच्या ७५% कर्जहमीसाठी पात्र असेल. यामुळे या योजने अंतर्गत बँकांना शैक्षणिक कर्जाचे वितरण करण्यासाठी पाठबळ मिळेल. उपरोल्लेखित अटींशिवाय आठ लाख रुपयांपर्यंतचे वार्षिक उत्पन्न असलेल्या आणि इतर कोणत्याही सरकारी शिष्यवृत्ती किंवा व्याज सवलत योजनेसाठी पात्र नसलेल्या विद्यार्थ्यांना १० लाख रुपयांपर्यंतच्या कर्जासाठी कर्ज परतफेडीच्या काळात ३ टक्के व्याज सवलत देखील दिली जाईल.

उच्च शिक्षण विभागाचे पीएम–विद्यालक्ष्मी हे युनिफाईड पोर्टल असेल ज्यावर विद्यार्थी शैक्षणिक कर्जासाठी सर्व बँकांकडून वापरल्या जाणाऱ्या अतिशय साध्या प्रक्रियेद्वारे अर्ज करू शकतात किंवा व्याज सवलत देण्याची विनंती



करू शकतात. व्याज सवलतीचा चुकारा ई–व्हाउचरच्या माध्यमातून आणि केंद्रीय बँक डिजिटल करन्सी(सीबीडीसी) वॉलेट्सच्या माध्यमातून करता येईल.

## अन्न महामंडळात १०,७०० कोटींच्या समभाग गुंतवणूकीला केंद्रीय मंत्रिमंडळाची मान्यता

**पंतप्रधान** नरेंद्र मोदी यांच्या अध्यक्षतेखाली केंद्रीय मंत्रिमंडळाच्या बैठकीत आर्थिक व्यवहार विषयक समितीने भारतीय अन्न महामंडळाला (FCI) खेळते भांडवल उपलब्ध होण्यासाठी २०२४–२५ या आर्थिक वर्षात १०,७०० कोटी रुपये इतक्या समभाग गुंतवणूकीला मान्यता दिली आहे. कृषी क्षेत्राला चालना देता यावी तसेच देशभरातील शेतकऱ्यांचे कल्याण सुनिश्चित करता यावे, या उद्देशाने मंत्रिमडळाने या निर्णयाला मान्यता दिली. केंद्र सरकार सरकारने उचललेल्या या धोरणात्मक पावलामुळे, सरकार शेतकऱ्यांना पाठबळ देण्याच्या दृष्टीने तसेच भारताच्या कृषी अर्थव्यवस्थेला बळकटी देण्यासाठी सरकारची वचनबद्धता दृढ असल्याचे दिसून येते. समभागामधील ही गुंतवणूक म्हणजे भारतीय अन्न महामंडळाला आपली ध्येय उद्दिष्टांची पूर्ण कार्यक्षमतेने आणि प्रभावीपणे पूर्ण करता यावीत, यादृष्टीने महामंडळाची क्षमता वाढावी या दिशेने टाकलेले एक महत्त्वाचे पाऊल ठरले आहे. सद्यस्थितीत भारतीय अन्न महामंडळ अल्पमुदतीच्या कर्जाचा आधाराने आपल्याला आवश्यक निधीच्या गरजेमधील दरी भरून काढत आहे. या गुंतवणुकीमुळे महामंडळावरचा व्याजाचा भार कमी होईल. ■

# आदिवासी समाजाला सक्षम करणारी प्रधानमंत्री वन बंधु कल्याण योजना

**जगातील** दुसऱ्या क्रमांकाची लोकसंख्या असलेला भारत हा आदिवासी विविधतेने परिपूर्ण आहे. एकूण लोकसंख्येत आदिवासी समुदायाचे प्रमाण ८.९ टक्के आहे. हिमालयापासून अंदमान निकोबारपर्यंत ७०० हून अधिक अनुसुचित जमाती आहेत. आदिवासी समाजात साहस तर आहेच शिवाय निसर्गाशी एकरुप होऊन ते तादात्म्य पावले आहेत. या आदिवासी समाजाचे सबलीकरण, सन्मान आणि कल्याणासाठी गेल्या दशकभरात खूप कामे करण्यात आली. विकासाच्या या प्रवासात समुदाय मागे पडू नये, यासाठी त्यांना खरे भागधारक बनवणे आवश्यक आहे. या मालिकेत, २८ ऑक्टोबर २०१४ रोजी सुरू झालेली प्रधानमंत्री वनबंधू कल्याण योजना दक्षकभरापासून आदिवासी समाजाचे सक्षमीकरण करत आहे.

देशाच्या या अभूतपूर्व विकास यात्रेत सर्वजण भागधारक असावेत, कोणीही मागे पडू नये, यासाठी देशाच्या दुर्गम भागात राहणाऱ्या आदिवासी समाजाच्या सामाजिक आणि आर्थिक स्तर उंचावण्यासाठी २८ ऑक्टोबर २०१४ रोजी प्रधानमंत्री वनबंधू कल्याण योजना (PMVKY) औपचारिकपणे सुरू करण्यात आली, या योजनेमुळे गेल्या दशकभरात अनेक स्तरांवर परिवर्तन घडून आले, गरीब-दलित-वंचितांचे सक्षमीकरण झाले. यापूर्वी स्वातंत्र्योत्तर काळात कित्येक दशके आदिवासी समाज दुलक्षित राहिला होता. देशाचे नेतृत्व बदलले आणि नव्याने आदिवासी समाजाला सक्षम करण्यासाठी पीएमव्हीकेवाय योजना सुरू करण्यात आली ज्यामध्ये देशभरातील सर्व आदिवासी लोक आणि सर्व आदिवासी लोकसंख्या असलेल्या भागांचा समावेश होतो.

### पीएमव्हीकेवायमध्ये आता खालील योजनांचा समावेश आहे

प्रधानमंत्री आदि आर्दश ग्राम योजना (पीएमएएजीवाय): पूर्वीच्या आदिवासी उपयोजना आणि विशेष केंद्रीय सहाय्य या योजनांना या छत्र योजनेत समाविष्ट करुन प्रधानमंत्री आदि आर्दश ग्राम योजना या नावाने ही योजना सुरू करण्यात आली. देशातल्या आदिवासी लोकसंख्या मोठ्या



प्रमाणात असलेल्या गावांमध्ये टप्याटप्याने मुलभूत सेवा आणि सुविधा पुरवणे हा त्याचा उद्देश आहे. या योजनेअंतर्गत रस्ते जोडणी, मोबाईल- इंटरनेट, शाळा, अंगणवाडी केंद्रे, आरोग्य उपकेंद्रे, पिण्याच्या पाण्याची सुविधा, सांडपाणी व्यवस्थापन, घनकचरा व्यवस्थापन आणि संपृक्तता उपक्रम यामधील समस्या दूर करण्यासाठी ३६ हजार ४२८ गावे नामनिर्देशित करण्यात आली आहेत. यामध्ये प्रत्येक गावाला २०.३८ लाख रुपये दिले जार आहेत. या योजनेसाठी २०२५- २६ पर्यंत ७ हजार २७६ कोटी रुपये खर्च केले जातील. ३१ जुलै २०२४ पर्यंत सुमारे १६ हजार गावांच्या योजनांना मंजुरी देण्यात आली असून २ हजार २८३ कोटी रुपये वितरीत करण्यात आले आहेत.

विशेषत: असुरक्षित आदिवासी गटांचा विकास (पीव्हीटीजी) - पंतप्रधान जनमन: या योजनेचा उद्देश तीन वर्षात पीव्हीटीजी कुटुंबावाना आणि वसाहतींना सुरक्षित घरे, पिण्याचे शुध्द पाणी, शिक्षण, आरोग्य आणि पोषण, रस्ते आणि दरसंचार कनेक्टिव्हिटी, घरगुती विद्युतीकरण आणि शाश्वत उदरनिर्वाहाच्या संधी यासारख्या मूलभूत सुविधा उपलब्ध करून देण्यावर मिशन मोडवर काम करणे हा आहे. या उद्दिष्टांची पूर्तता नऊ मंत्रालयांच्या सहकार्याने करण्याची योजना आहे. आदिवासी व्यवहार मंत्रालय हे त्याचे नोडल किंवा प्रमुख मंत्रालय आहे तर उर्वरित मंत्रालये पीएम जनमन अंतरत वाटप केलेल निधीतून या उपाययोजना राबविण्यासाठी जबाबदार आहेत. या योजनांचा लाभ १८ राज्ये आणि अंदमान निकोबार केंद्रशासित प्रदशातल्या ७५ पीव्हीटीजी समुदायांना होणार आहे.

**(पूर्वार्ध)**



**जत, (जि. सांगली)– उपस्थिती–** भाजपा उमेदवार आ.गोपीचंद पडळकर, पंचायतराज प्रकोष्ठ प्रदेश संयोजक गणेश जगताप, निनाद पटवर्धन, माऊली हळवणकर, राघवेंद्र चौघुले, पंचायतराज मिडिया प्रमुख मयुर गंभीरे आदी.



**पंढरपुर– उपस्थिती–** विधानसभा महायुतीचे उमेदवार आ.समाधान अवताडे, पंचायतराज प्रकोष्ठ प्रदेश संयोजक गणेश जगताप, निनाद पटवर्धन, सोलापूर जिल्हाध्यक्ष गणेश भोसले, जिल्हा उपाध्यक्ष ज्योती जोशी, पंचायतराज मिडिया प्रमुख मयुर गंभीरे आदी.



**ठाणे येथील श्रीरंग सोसायटीमध्ये महायुतीचे उमेदवार संजय केळकर यांच्या प्रचारार्थ कोपरा बैठक– उपस्थिती–** पंचायतराज व ग्रामविकास विभाग प्रदेश संयोजक गणेश जगताप, विभाग संयोजक कोकण (उत्तर) सुषमा ठाकूर, कन्हैयालाल विश्वकर्मा, सलमान शेख आदी.



**नाशिक– अल्पसंख्याक बैठक– उपस्थिती–** अल्पसंख्याक मोर्चा प्रदेश अध्यक्ष इद्रिस मुल्तानी आदी.

**नाशिक– घरोघरी प्रचार– उपस्थिती–** महानगर अध्यक्ष प्रशांत जाधव, ज्येष्ठ कार्यकर्ते अभय छल्लाणी, नंदकुमार देसाई, नरेंद्र सोनवणे, प्रदीप पाटील, कैलास चौधरी, अविनाश जासुंदे, शिरीष भुमकर, भारती मोरे, नानीवडेकर, मिनाक्षी वैद्य, भुमकर आदी.





**पीएम विश्वकर्मा योजनेचे मुंबईतील पहिले लाभार्थी मनोज गोहिल यांना पीएम विश्वकर्मा लाभार्थी प्रमाणपत्र देताना रेल्वेमंत्री अश्विनी वैष्णव. उपस्थिती–** मुंबई संयोजक नरेंद्र गावकर. मुंबईतील पहिले १० लाभार्थी पुढीलप्रमाणे– प्रदीप आसाराम फुले (माळी समाज), कुशल नरसी वाघेला (दर्जी समाज), नारायणलाल मीना (दर्जी समाज), मनोज पोपटलाल गोहील (दर्जी समाज), राजेंद्र डेरवणकर (नाभिक समाज), राजेश दत्ताराम पुजारी (सुतार समाज), गंगुबाई आसाराम फुले (माळी समाज), भरत नरसी वाघेला (दर्जी समाज), नरसु भीमजी वाघेला (दर्जी समाज), सुनंदा रामचंद्र कोळी (कोळी समाज), नम्रता नंदकिशोर राणे (माळी समाज).



**मालेगाव– प्रचार फेरी– उपस्थिती–** सुनील गायकवाड, भाजपा उमेदवार बंडू काका बच्छाव, संजय काळे, भूषण पत्तीर, महेश पाटील, स्वप्नील चव्हाण, नाना खैरनार, करणं देवरे, सचिन पाटील, बाळा पाटील, महेश महाले, धीरज जगताप, सनी वाघ, विशाल महाले, अनिल चव्हाण, कपिल डॉन, गणेश शेनगे आदी.



**जिंतूर– उपस्थिती–** केंद्रीय गृहमंत्री अमित शाह, भाजपा उमेदवार आ. मेघना बोर्डीकर, रामप्रसाद बोर्डीकर, हरीभाऊ लहाने, सभापती गंगाधर बोर्डीकर, संतोष मुरकुटे, भावना बोर्डीकर, डॉ.विद्या चौधरी, सुरेश भुमरे, राधा शेळके, डॉ.संजय रोडगे, गोविंद थिटे, दत्ता कदम, प्रमोद चव्हाण, व्यंकटराव शिंदे, मनोज वाकळे आदी.



**चाळीसगाव– उपस्थिती–** केंद्रीय गृहमंत्री अमित शाह, भाजपा उमेदवार आ. मंगेश चव्हाण, ग्रामविकास मंत्री गिरीश महाजन, खा. स्मिता वाघ, माजी आमदार साहेबराव घोडे, महायुतीचे उमेदवार आ. किशोर आप्पा पाटील, महायुतीचे उमेदवार अमोल चिमणराव पाटील, भाजपा जिल्हाध्यक्ष ह.भ.प.ज्ञानेश्वर महाराज जळकेकर, राष्ट्रवादीचे जिल्हाध्यक्ष संजय पवार, एकलव्य संघटनेचे प्रदेशाध्यक्ष पवन राजे सोनवणे, बंजारा टायगर्स संघटनेचे राष्ट्रीय अध्यक्ष आत्माराम जाधव, रिपाईचे जिल्हाध्यक्ष आनंद खरात आदी.



**शिराळा (जि. सांगली)– उपस्थिती–** केंद्रीय गृहमंत्री अमित शाह, भाजपा उमेदवार सत्यजीत देशमुख, निशिकांत पाटील, आ. सदाभाऊ खोत, खा.धैर्यशील माने आदी.




**मुंबई– महायुती विजय संकल्प– उपस्थिती–** पंतप्रधान नरेंद्र मोदी, केंद्रीय मंत्री पीयूष गोयल, केंद्रीय मंत्री रामदास आठवले, मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, राष्ट्रीय सरचिटणीस विनोद तावडे, कौशल्य विकास मंत्री मंगलप्रभात लोढा, विधानसभा अध्यक्ष राहुल नार्वेकर आदी.




**धुळे– उपस्थिती–** पंतप्रधान नरेंद्र मोदी, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, केंद्रीय मंत्री प्रतापराव जाधव, केंद्रीय क्रीडा राज्यमंत्री रक्षा खडसे, सार्वजनिक बांधकाम मंत्री (सार्वजनिक उपक्रम) दादा भुसे, प्रदेश सरचिटणीस विजय चौधरी, भाजपा जिल्हाध्यक्ष बबनराव चौधरी आदी.




**सोलापूर– उपस्थिती–** पंतप्रधान नरेंद्र मोदी, आ. विजय देशमुख, आ. सुभाष देशमुख, आ. सचिन कल्याणशेट्टी, शहराध्यक्ष नरेंद्र काळे, देवेंद्र कोठे, खा. धनंजय महाडिक आदी.

RNI NO. MAHMAR/2018/76180
Posting Under the Registration No.MCS/221/2024-26, License To Post Without Prepayment,
WPP Licence No.: MR/Tech/WPP-351/South/2024-26, Posted at Mumbai Patrika Channel Sorting Office, Mumbai-400001.
Published on 1st and 16th of every month and Posted on 8th, 9th, 10th and 23rd, 24th, 25th of every month.

https://www.facebook.com/bjpmanogat @manogatbjp




प्रति,

______________________

______________________

______________________

______________________

**प्रेषक,**
**कार्यालय मंत्री :**
भारतीय जनता पार्टी,
महाराष्ट्र प्रदेश कार्यालय,
वसंतराव भागवत चौक, नरिमन पॉईंट, मुंबई-२०
दूरध्वनी : ०२२-२२०२२०५०, फॅक्स : ०२२-२२८५२३०५
ई मेल- bjpmaha.manogat@gmail.com